
K L THAKUR
AND SONS SARAF
Since 1928
Gold | Silver | Diamond
3209, Bagwanpur, Kamod Road, Nasik-422001
0253-2505488 | 2504258



नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक खपाचे पहिले सायंदैनिक

किंमत २

# भ्रमर

BHRAMAR



Physioflex. Working towards healthy lifestyle
Physiotherapy Clinic & Fitness Studio
Dr. Moinuddin Farooque (CEO physioflex)
PHYSIOTHERAPIST (M.S.P.T.)
9021756646 8329099901
Physiofit Clinic, Shop Number 2, Jumma Masjid, Naikwadi Pura, Patil Gali, Old Nashik
Shivraya Multi Speciality Hospital, DGP Nagar 2, Ambad Link Rd., Near Mauli Lawns, Kamatwade, Nashik



वर्ष ५२ वे, अंक २८३
Year : 52, Issue No. : 283

नाशिक, बुधवार दि. २६ मार्च २०२५
Nashik, Wednesday 26 March 2025

R.N.I. Regd. No.20904/72
Postal Reg. No. NSK/16/2024-2026

पाने ६, किंमत २ रुपये
Pages : 6, Price Rs. 2


# नहीं आती मराठी, क्या करेगा ?

## डी-मार्ट कर्मचाऱ्याला मनसेने शिकवला धडा

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :–** अंधेरी पश्चिमेकडील वर्सोवा येथील डी–मार्टमध्ये कर्मचारी आणि ग्राहकामध्ये वाद झाला. डी मार्टमधील कर्मचाऱ्याला ग्राहकाने मराठीत बोलण्याची विनंती केली. मात्र, त्याने मराठीत बोलण्यास नकार दिला. त्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याला दमबाजी करत धडा शिकवला.

महाराष्ट्राच्या राज्यभाषेला म्हणजेच मराठी भाषेला केंद्र सरकारकडून अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. परंतु अभिजात भाषेचा दर्जा मिळूनही राज्यात मराठी भाषा अधिक हाल सोसू लागली असल्याची उदाहरणे वारंवार समोर येऊ लागली आहेत. एअरटेल गॅलरीतील एका उर्मट कर्मचाऱ्याने मराठी बोलण्यास नकार दिल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आता डी–मार्टमधील कर्मचाऱ्याचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. याप्रकरणी मनसेने वेळीच हस्तक्षेप केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने माफी मागितली. यावेळी ग्राहकाने या कर्मचाऱ्याला मराठीत बोलण्याचा आग्रह केला. मात्र मी मराठी बोलणार नाही, हिंदीतच बोलणार, असे उद्धटपणे उत्तर त्याने दिले. मी हिंदीतच बोलणार, तुला काय करायचे ते कर, असे तो ग्राहकाला उर्मटपणे म्हणत होता. पण ग्राहक मराठी बोलण्यावर अडून राहिला. त्यावर मी मराठीत नाही बोललो तर तू काय करणार? तुला काय त्रास आहे? असा उलट प्रश्न तो हिंदीतून विचारू लागला. मला मराठी शिकवायला आला आहेस का?, असेही त्याने विचारले. ज्या ग्राहकाबरोबर हा वाद झाला तो मनसेचा पदाधिकारी होता. त्यामुळे त्यांनी इतर पदाधिकाऱ्यांना बोलावून मनसे स्टाईल खळखट्याक केला. वर्सोव्याचे मनसे विभाग अध्यक्ष संदेश देसाई यांच्या नेतृत्वाखाली मनसैनिकांनी या ठिकाणी जाऊन त्या कर्मचाऱ्याला कडक शब्दांत समज देऊन त्याला मराठीत बोलावला भाग पाडले. तसेच त्याने माफीही मागितली.

# कर्जाची जास्त रक्कम दाखवून बँकेच्या अधिकाऱ्याने केली साडेपाच कोटींची फसवणूक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** बनावट कागदपत्रांच्या आधारे कर्ज मागणी रक्कम कमी असताना ती जास्त दाखवून अधिकाऱ्याने बँकेची सुमारे साडेपाच कोटी रुपयांचा अपहार करून फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी बी. बी. बेहरा (रा. नाईस वास्तू, नाशिकरोड) यांनी गंगापूर रोडवरील थत्तेनगरमधील ॲग्री हायटेक शाखा बँक ऑफ महाराष्ट्र या शाखेची जोखीम आधारे अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आले. त्या लेखापरीक्षणात ॲग्री हायटेक शाखा बँक ऑफ महाराष्ट्र, थत्तेनगर शाखेचे तत्कालीन शाखाधिकारी आरोपी सुभाष विठ्ठल कौटे (वय ४०, रा. जवळेबाळेश्वर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) हे बँकेत कार्यरत होते. कौटे यांनी त्यांच्या पदाचा दुरुपयोग करून एकूण ३६ खातेदारांची कर्जप्रकरणे मंजूर करताना खातेदारांशी संगनमत केले.

बनावट कागदपत्रांच्या आधारे खातेदारांकडून कर्जाची मागणी रक्कम कमी असतानासुद्धा ती रक्कम जास्त असल्याचे दाखविले, तसेच काहींचे कर्जखाते नसतानासुद्धा कर्जखाते असल्याचे भासविले. त्याचप्रमाणे त्या कर्जावर अनुदानाची रक्कम मंजूर करून ती कर्जदारांच्या बचत खात्यांवर वर्ग करून एकूण ५ कोटी ५५ लाख ६६ हजार ५१३ रुपयांचा अपहार करून बँकेची व शासनाची आर्थिक फसवणूक केली. हा प्रकार दि. १० जानेवारी २०२३ ते २५ जुलै २०२४ या कालावधीत बँक ऑफ महाराष्ट्रच्या थत्तेनगर येथील ॲग्री हायटेक शाखेत घडला.

या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात तत्कालीन शाखा मॅनेजर सुभाष कौटे याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक सोनवणे करीत आहेत.

# भरधाव दुचाकीच्या धडकेने वृद्ध ठार

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** रस्त्याने पायी जाणाऱ्या वृद्धाचा भरधाव दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना दिंडोरी रोड येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी विनोद दत्तोबा म्हस्के (रा. म्हसोबावाडी जकात नाका, दिंडोरी रोड) यांचे वडील दत्तोबा दगडू म्हस्के (वय ६५) हे काल (दि. २५) दुपारी १२ वाजेच्या सुमारास घराजवळ फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी दिंडोरीकडून भरधाव आलेल्या एमएच १५ केबी २५०३ या क्रमांकाच्या मोटारसायकलस्वाराने म्हस्के यांना जोराची धडक दिली. त्यात त्यांना जबर मार लागल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघाताची कोणतीही खबर न देता दुचाकीस्वार पळून गेला. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात दुचाकीस्वाराच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक परदेशी करीत आहेत.

# सराफ बाजारात विनापरवाना झाडांची कत्तल

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शासकीय कार्यालयाची परवानगी न घेता दोन झाडे तोडल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नाशिक मनपाचे उद्यान विभागाचे अधिकारी किरण गणेश बोडके (रा. राजेंद्रनगर सोसायटी, गणेशवाडी, पंचवटी) यांनी सरकारवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यात म्हटले, की सराफ बाजारातील गायधनी गल्ली येथील जोशी वाडा येथे जागामालक आरोपी श्याम दुसाने (रा. नाशिक) यांनी नाशिक महापालिका, पोलीस विभाग अथवा कोणत्याही शासकीय कार्यालयाची परवानगी न घेता दोन झाडे अनधिकृतपणे बुडापासून कापली आहेत. हा प्रकार दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडला. याबाबत सरकारवाडा पोलीस ठाण्यात श्याम दुसाने यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार जाधव करीत आहेत.

# तोतया पोलिसांनी लांबविले वृद्धेचे पाच तोळ्यांचे दागिने

**नवीन नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** पोलीस असल्याची बतावणी करून दोन अनोळखी इसमांनी वृद्धेच्या अंगावरील पाच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हातचलाखी करून चोरून नेल्याची घटना चेतनानगर येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी छायाताई अरविंद देशमुख (वय ६५, रा. कृष्णाई गॅलॅक्सी, चेतनानगर, नाशिक) या काल (दि. २५) चेतनानगर येथे ॲस्ट्रल प्री स्कूल सेंट फ्रान्सिस स्कूलजवळ एका झाडाखाली उभ्या होत्या. त्यावेळी दोन अनोळखी इसम देशमुख यांच्याजवळ आले. त्यांनी संगनमत करून पोलीस असल्याची बतावणी केली. ''परिसरात एका महिलेचा गळा कापून सोन्याचे मंगळसूत्र नेले आहे. तुम्ही तुमच्या अंगावरील दागिने काढून बॅगेमध्ये ठेवा,'' असे म्हणत फिर्यादीच्या अंगावरील २० हजार रुपये किमतीचा दहा ग्रॅम वजनाचा सोन्याचा गोफ, २० हजार रुपये किमतीची दहा ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ८० हजार रुपये किमतीच्या २० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या दोन बांगड्या असे १ लाख २० हजार रुपये किमतीचे दागिने बॅगेत ठेवताना हातचलाखी करून हे दागिने तोतया पोलिसांनी महिलेचे लक्ष विचलित करून फसवणूक करून चोरून नेले. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात दोन तोतया पोलिसांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार शेख करीत आहेत.

# पोलिसांत तक्रार दिल्याच्या रागातून दोघांकडून घरावर दगडफेक

**शांतीनगरमधील घटना, वाहनाच्या काचाही फोडल्या**

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** पोलिसांत तक्रार केल्याचा राग मनात धरून दोघा तरुणांनी घरावर दगडफेक करून घरासमोर उभ्या असलेल्या पिकअप वाहनाच्या काचा फोडून नुकसान केल्याची घटना शांतीनगर येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी मीना रामदास नाईक (रा. सागर अपार्टमेंट, शांतीनगर, मखमलाबाद, नाशिक) या व त्यांचे पती काल (दि. २५) सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घरी होते. त्यावेळी आरोपी दादू खटक्या व शंभू रायकर (दोघेही रा. शांतीनगर) हे त्यांच्या घराजवळ आले. आरोपींनी संगनमत करून पोलिसांत तक्रार दिल्याचा राग मनात ठेवून फिर्यादी नाईक यांच्यासह त्यांचे पती व मुलाला शिवीगाळ केली व ''तुम्ही येथे कसे राहता, तुमच्याकडे पाहतो,'' असा दम देऊन जीवितास धोका निर्माण केला, तसेच फिर्यादीसह त्यांच्या कुटुंबाला दुखापती करण्याच्या उद्देशाने घरावर दगडफेक केली, तसेच घरासमोर उभ्या असलेल्या एमएच १५ जेसी ०५४१ या क्रमांकाच्या महिंद्रा पिकअप वाहनाच्या काचा फोडून नुकसान केले व त्यानंतर दोघेही आरोपी पळून गेले. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार गोरे करीत आहेत.

# चोरट्यांनी शहरातून लांबवल्या चार दुचाकी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शहर परिसरात वाहनचोरीचे सत्र सुरु असून, वेगवेगळ्या ठिकाणांहून चार मोटारसायकली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

वाहनचोरीचा पहिला प्रकार गोदाघाट येथे घडला. फिर्यादी राजकुमार धीरो सिंह (रा. मारुती संकुल, दातीरनगर, नाशिक) हे दि. २४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता गोदाघाट येथे आले होते. त्यावेळी त्यांनी यशवंत महाराज पटांगणाजवळ एमएच १५ सीझेड ८९३७ या क्रमांकाची २० हजार रुपये किमतीची हिरोहोंडा पॅशन प्रो मोटारसायकल उभी केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहनचोरीचा दुसरा प्रकार पंचवटीत घडला. फिर्यादी धनंजय अनंत पुजारी (रा. काळाराम मंदिर, दक्षिण दरवाजा, नाशिक) यांनी राहत्या घराजवळ एमएच १५ बीवाय ८९६२ या क्रमांकाची २० हजार रुपये किमतीची हिरोहोंडा स्प्लेंडर मोटारसायकल उभी केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहनचोरीचा तिसरा प्रकार सिव्हिल हॉस्पिटल येथे घडला. फिर्यादी चंद्रशेखर खंडेराव पवार (रा. जुईनगर, मखमलाबाद) यांनी सिव्हिल हॉस्पिटलच्या पार्किंगमध्ये एमएच १२ बीआर ३२२९ या क्रमांकाची दहा हजार रुपये किमतीची होंडा कंपनीची मोटारसायकल पार्क केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात मोटारसायकलचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहनचोरीचा चौथा प्रकार नाशिकरोड येथे घडला. फिर्यादी तेजस कैलास काकड (रा. सावरकरनगर, सातपूर कॉलनी) यांनी दि. २० मार्च रोजी सकाळी १० वाजता नाशिकरोड येथे प्रतीक आर्केड बिल्डिंगजवळ ऑफिसच्या ठिकाणी एमएच १५ एचए ९७४२ या क्रमांकाची ४० हजार रुपये किमतीची बजाज पल्सर मोटारसायकल पार्क केली होती. ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून चोरून नेली. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात दुचाकीचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिंहस्थ रस्त्यांसाठी तांत्रिक सल्लागार नेमणार, ३ हजार कोटींची कामे : २५ लाख टोकन तरतूद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** कुंभमेळा दोन वर्षांवर येऊन ठेपला असून महानगरपालिकेकडून कामकाजाला वेग आला आहे. सिंहस्थात तीन हजार कोटींच्या रस्त्यांची कामे हाती घेण्यात येणार असून महानगरपालिका रस्त्यांच्या कामांवर वॉच ठेवण्यासाठी तांत्रिक सल्लागार व स्वतंत्र पडताळणी गुणनियंत्रक सल्लागाराची नेमणूक करणार आहे. त्यास महासभेने मान्यता दिली. सल्लागारास २५ लाख टोकनच्या तरतुदीस मान्यता दिली आहे.

मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या महासभेत नाशिक – त्र्यंबकेश्वर येथे सन २०२७–२८ दरम्यान कुंभमेळा होणार असून मनपा प्रशासनाने १५ हजार कोटींचा आराखडा तयार केला आहे. त्यात सर्वाधिक कामे बांधकाम विभागाची आहेत. त्यात आउटर व इनर रिंगरोड, मिसिंग लिंक, शहराला जोडणारे रस्ते यांचा प्रामुख्याने समावेश आहे. सद्यस्थितीत सर्व विभागांच्या सर्वेक्षणासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आलेली आहे व त्यांच्यामार्फत सर्वेक्षणाची कामे प्रगतीपथावर आहेत.

कुंभमेळ्यामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या रस्त्यांचे संरचनात्मक परिक्षण करणे आवश्यक असून त्यामध्ये सुचविलेल्या दुरुस्त्यानुसार डागडुजी व नुतनीकरणाची कामे करणे आवश्यक आहे. रस्त्यांचे सविस्तर प्राकलन तयार करणे, आय. आर. सी. नुसार डिझाईन करणे आदींसाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. आगामी कुंभमेळा कामांसाठी शिल्लक कालावधी लक्षात घेता रस्ते (पूल वगळून) कामांसाठी लागणारा कालावधी लक्षात घेता तातडीने रस्त्यांच्या कामासाठी तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

पर्वणी सन २०२७ वर्षाच्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात आहे. प्रत्यक्ष कामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. रस्ते विकास कामांसाठी सुमारे १८ ते २० महिन्यांचा कालावधी लागणार आहे. या दृष्टीकोनातून प्रस्तावित रस्ता कामांचे डिझाईन, निविदा तयार करणे, त्याची तांत्रिक तपासणी व कामाच्यावेळी गुणवत्ता यासाठी सल्लागार नेमणूक करणे आवश्यक आहे. अभियंता, अद्ययावत लॅबची कमतरता रस्त्यांची कामे करण्यासाठी दोन वर्षांहून कमी कालावधी शिल्लक आहे. तसेच महानगरपालिकेकडे अभियंत्यांची मोठी कमतरता भासते. सर्व प्रकारच्या तांत्रिक तपासणीसाठी अद्ययावत प्रयोग शाळा उपलब्ध नाही. त्यामुळे सल्लागाराची नेमणूक केली जात आहे.

# जि. प. च्या अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणी मोहीम यशस्वी

## आता डिजिटल शिक्षण देण्याचा मानस : आशिमा मित्तल



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिला मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील स्वमालकीच्या इमारतीत असलेल्या अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेची शासनाने घेतलेली दखल ही महिला व बालविकास विभागांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्याच्या कामाची पावती आहे. त्याचबरोबर पुढील काळात अंगणवाडी केंद्रातून डिजिटल शिक्षण देण्याचा जि. प. चा मानस आहे, अशी माहिती जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

नाशिक जिल्हा परिषदेने अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणीकरिता जिल्ह्यात विशेष मोहिम राबविली आहे. नाशिक जि. प. ने राबविलेल्या या वीजजोडणी विशेष मोहिमेची शासनाने दखल घेतली आहे. त्यामुळे नाशिकचा हा उपक्रम आता संपूर्ण राज्यभर राबविला आणार आहे. त्यानुसार राज्यभरातील अंगणवाडी केंद्रांना वीजजोडणी करण्याचे निर्देश राज्याच्या महिला व बालविकास विभागाच्या सचिवांनी दिले आहेत.

केंद्र सरकारच्या 'सक्षम अंगणवाडी' योजनेअंतर्गत स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांना आवश्यक सुविधांसाठी बीजजोडणी अनिवार्य आहे. जि. प. महिला व बालकल्याण विभागाच्या अंतर्गत जिल्ह्यात पाच हजार ११५ अंगणवाडी केंद्रे कार्यरत आहेत, त्यापैकी चार हजार २५६ केंद्रे स्वमालकीच्या इमारतींमध्ये आहेत. त्यातील ४०३ केंद्रांना आधीपासूनच वीज सुविधा असून, ६६८ केंद्रांना सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजपुरवठा सुरू होता. दरम्यान, सीईओ मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत तीन हजार ३० अंगणवाडी केंद्रांना वीजजोडणी नसल्याचे निदर्शनास आले, त्यानंतर तातडीने गटविकास अधिकारी, बाल विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि महापारेषणच्या उपअभियंत्यांच्या संयुक्त प्रयत्नाने या केंद्रांना वीजपुरवठा करण्याची मोहीम सुरू करण्यात आली.

या प्रयत्नांतर्गत आतापर्यंत ग्रामीण भागातील तीन हजार १५ अंगणवाडी केंद्रांना यशस्वीपणे वीजजोडणी देण्यात आली आहे. जि. प. ने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून विशेष मोहीम राबवून या अंगणवाडी केंद्रांना वीजजोडणी करून दिली.

# जि. प. त मार्च एंडिंगच्या कामाची लगबग सुरू

## सुमारे २५ टक्के निधी खर्च करण्याचे काम बाकी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** कोणत्याही शासकीय कार्यालयात मार्चएंड म्हटला की चांगलीच धावपळ सुरू असते. कारण मार्चएंड म्हणजेच मार्च अखेर सर्व वार्षिक जमाखर्चाचा हिशेब करावा लागतो. सध्या जिल्हा परिषद कार्यालयात देखील मार्च महिन्याच्या अखेरच्या हिशेबाचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. त्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगली धावपळ सुरू असल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेसमोर सध्यातरी २५ टक्के निधी खर्च करण्याचे काम बाकी असल्याचे समजते.

मार्च अखेरला केवळ चार दिवस शिल्लक असल्याने जि. प. प्रशासनाची धावपळ सुरू असून, प्राप्त निधीपैकी अजूनही १११ कोटी रुपये निधी खर्चाचे आव्हान आहे.




जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा परिषदेला २०२३–२४ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या ४३२ कोटींपैकी १५ मार्चपर्यंत ३२१ कोटी (७५ टक्के) निधी खर्च झाला आहे. राज्यात आणि जिल्ह्यात लोकसभे पाठोपाठ विधानसभा, विधान परिषद निवडणूक आचारसंहितेमुळे जिल्हा परिषदेत निधी खर्चाला काहीसा अडथळा निर्माण झाला होता. आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर प्रशासनाची निधी खर्चासाठी धावपळ सुरू झाली. मात्र, विभागांचा निधी खर्चाचा वेग कमी असल्याचे दिसत आहे. जिल्हा परिषदेला दरवर्षी जिल्हा नियोजन समितीकडून सर्वसाधारण योजना, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती घटक उपयोजना यासाठी निधी दिला जातो. हा निधी खर्च करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी असतो. २०२३–२४ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजनकडून जिल्हा परिषदेस ३४८ कोटी ३४ लाखांचा नियतव्यय मंजूर झाला. प्रत्यक्षात जिल्हा परिषदेला ४३२ कोटी ३२ लाखांचा निधी 'बीडीएस'द्वारे प्राप्त झाला. तो खर्च करण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंतची मुदत आहे. १५ मार्च २०२५ अखेर यातील ३२१ कोटी निधी खर्च झाला आहे. उर्वरित १११ कोटी म्हणजे २५.७८ टक्के निधी बाकी आहे.

# मार्च अखेरमुळे कर विभागात लगबग

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** मार्चअखेरला अवघे पाच दिवस राहिल्याने नाशिक महानगरपालिका प्रशासन विभाग अधिक गतिमान झाला असून, कर वसुली विभागात धावपळ सुरू आहे.

घरपट्टी, पाणीपट्टीच्या थकबाकी वसुलीसाठी बिले पाठविण्याला वेग आला आहे. सातपूर, सिडको, पंचवटी, नाशिकरोड, नाशिक पूर्व आणि नाशिक पश्चिम विभागांत पथकांकडून कामे सुरू आहेत. दि. २५ मार्च अखेरपर्यंत पाणीपट्टीची ४६ कोटी रुपयांची वसुली झाली होती. टार्गेट ७५ कोटींचे असून, अजून २९ कोटींची बाकी आहे. तर घरपट्टीसाठी २४५ कोटींचे टार्गेट होते. ते मात्र २४६ कोटी वसूल झाले आहे.

टार्गेटपेक्षा एक कोटींची अधिक वसुली झाली आहे. नागरिकांनी लवकरात लवकर कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन कर उपायुक्त अजित निकत यांनी केले आहे.

# गुंठेवारीतील बांधकाम नियमितीकरणाची संधी, मनपा आकारणार विकास शुल्काच्या तिप्पट दर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** शहरातील गुंठेवारीतील बांधकामधारकांना विकास शुल्काच्या तिप्पट दर आकारुन नियमितीकरणाची संधी मनपाने दिली आहे. या प्रस्तावास महासभेने मंजुरी दिली. नगररचना विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर नियमित शुल्क आकारून गुंठेवारीतील बांधकामे नियमित केली जाणार आहेत.

शासन निर्णयानुसार शहरात ३१ डिसेंबर २०२० पर्यंत उभारण्यात आलेली गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शहर परिसरात अनेक भागात गुंठेवारीतून बांधकामे विकसित झाली आहेत. महानगरपालिकेची कुठलीही परवानगी न घेता, लेआऊट मंजूर न करता उभारलेली ही बांधकामे अनधिकृत आहेत. या अधिकृत बांधकामांच्या नियमितीकरणासाठी शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमितीकरण करणे व श्रेणीवाढ) अधिनियम २००१ अन्वये प्रशमन शुल्क आकारून नियमितीकरणाची परवानगी महापालिकांना दिली होती.

नियमावलीअंतर्गत अर्ज सादर करण्याची मुदत सहा महिने अर्थात १२ फेब्रुवारी २००२ पर्यंतच होती. त्यानंतर शासनाने २ मार्च २०२१ रोजी निर्णय पारित करत गुंठेवारी नियमित करण्याच्या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गुंठेवारी अंतर्गत विकसित भूखंड नियमित करण्यास मान्यता दिली. नाशिक महानगरपालिका हद्दीमधील गुंठेवारी बांधकामे नियमितीकरणासाठी प्रशमन शुल्क, विकास शुल्क व तपासणी फी तसेच वृक्षनिधी व मल:निस्सारण फी आकारली जाईल. त्याचबरोबर ५ रुपये प्रति चौरस मीटर दराने तपासणी फीदेखील आकारली जाणार आहे.

# भुयारी गटार व मल:निस्सारण अधीक्षक अभियंतापदी रवींद्र धारणकर यांना पदोन्नती

## मनपा महासभेत १८ जणांना दिली बढती

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिकेत अनेक दिवसांपासून रखडलेल्या अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीला अखेर मुहूर्त लागला असून महासभेने अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, अभियंता अशा एकूण १६ जणांना बढती दिली आहे. तर नऊ जणांना पदोन्नती नाकारण्यात आली. मनपा भुयारी गटार व मल:निस्सारण अधीक्षक अभियंतापदी रवींद्र धारणकर यांना पदोन्नती मिळाली.

नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या महासभेत ही मंजुरी देण्यात आली. मागील अनेक दिवसांपासून मनपात पदोन्नत्या रखडल्या होत्या. त्या मार्गी लावण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. त्यात अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, मुख्यलेखापरिक्षक बळवंत गायकवाड, प्रशासनाधिकारी लक्ष्मीकांत सातळकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दत्तात्रय पाथरुट व शहर अभियंता संजय अग्रवाल यांचा समावेश होता. मागील वर्षात लोकसभा, शिक्षक व नंतर विधानसभा निवडणूक आचार संहितेमुळे पदोन्नती (पान ५ वर)




## राशीभविष्य

- **मेष** : कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. उत्साहाने रहावं. भावंडांबद्दल चिंता संभवते.
- **वृषभ** : दुर्गुण त्यागावे. शारीरिक तक्रारी वाढतील. वाद टाळावे. अडचणी कमी होतील.
- **मिथुन** : सुखस्वास्थ्य लाभणार असून मनावरील दडपण कमी होणार आहे. रेंगाळलेले प्रश्न सुटतील.
- **कर्क** : आर्थिक समस्या कमी होतील. धडाडी वाढणार आहे. महत्त्वाच्या कामात अधिक लक्ष घालावे.
- **सिंह** : देणेकऱ्यांना चुकवू नका. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. शिक्षणात समस्या संभवतात.
- **कन्या** : कार्यक्षेत्रात संघर्ष करावा लागेल. ठाम विचाराने रहावं. स्थावर प्रश्न वाढवू नका. प्रवास टाळा.
- **तूळ** : जुनी येणी वसुल होतील. व्यर्थ चिंता करु नका. घाईने घेतलेले निर्णय नुकसानीचे ठरतील.
- **वृश्चिक** : हाती घेतलेली कामं मनासारखी होतील. कोणास जामीन राहू नका. विचाराने गुंतवणूक करा.
- **धनु** : नोकरीत जबाबदाऱ्या वाढतील. घरात शुभकार्य घडतील. अपेक्षित कामं पूर्ण होतील.
- **मकर** : देण्याघेण्याच्या व्यवहारात लक्ष घालावे. कलागुणांचा विकास होईल. सुसंधी लाभतील.
- **कुंभ** : प्राप्तीचं प्रमाण साधारण राहील. अनावश्यक खर्च टाळावा. संततीशी मतभेद संभवतात.
- **मीन** : जबाबदाऱ्यांची विभागणी करावी. ताण फार वाढवू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

### सल्ला मोलाचा

## केस धुताना काळजी घ्या

केसांचं आरोग्य उत्तम राहावं यासाठीच्या टीप्स.

– आपले केस कोरडे, तेलकट आणि मिश्र यांपैकी कोणत्या प्रकारचे आहेत ते पाहून योग्य शांपूची निवड करा. – दर दिवसाआड केस रात्री तेलानं मालिश करून दुसऱ्या दिवशी शांपूने स्वच्छ धुवून टाका. केस धुण्याआधी दीड तास कोमट तेलानं मसाज केला तरी पुरेसं ठरतं. – केस गळू नयेत यासाठी शांपू लावण्याआधी केस चांगले ओले करून घ्या. शांपू लावल्यावर अर्ध्या मिनिटानं केस धुवून टाका. – केस धुण्यासाठी कोमट किंवा शक्य असेल तर थंड पाण्याचा वापर करा. – चमक यावी म्हणून चहाच्या पाण्यानंही केस धुवू शकता. – केस्रांना शांपू केल्यानंतर कंडिशनरचाही वापर करा. – केस वाळवण्यासाठी हेअर ड्रायरचा वापर करू नका. जर लवकर केस कोरडे करायचे असतील तर केसांभोवती पंचा गुंडाळून ठेवा. पंचाने केस जोरात पुसू नका. – पंख्याखाली वाळवून केस कोरडे करू नका.

## २६ मार्च

### दिनविशेष

- १९९७ : ज्येष्ठ गांधीवादी आणि उद्योगपती नवकमल फिरोदिया यांचा मृत्यू.
- २०१५ : विश्वकरंडक स्पर्धेमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव.
- २०१६ : 'स्टिंग ऑपरेशन'मुळे उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरीश रावत अडचणीत.
- २०१७ : राजकीय पक्षांसाठी 'नो ड्यूज' चा प्रस्ताव.
- २०१८ : अमेरिकेने सात पाकिस्तानी कंपन्यांना आपल्या देशात व्यवसाय करण्यास बंदी घातली.

### जाणून घ्या

## औषधांविषयी

चला, औषधांच्या जगात एक फेरफटका मारू या. औषधांचे प्रकार आणि रंग वेगवेगळे असतात. एखादी गोळी निळ्या रंगाची असते तर एखादी पिवळ्या रंगाची असते. या गोळ्यांमुळे तुम्हाला बरं वाटतं. बरीचशी औषधं प्रयोगशाळांमध्ये तयार केलेली असतात. बऱ्याच औषधांमध्ये नैसर्गिक घटकांचा वापर केलेला असतो. निर्मिती केल्यानंतर औषधाची चाचणी केली जाते. या चाचण्या एक किंवा जास्त वेळाही केल्या जातात. काही चाचण्या माणसांवर तर काही प्राण्यांवर केल्या जातात. या चाचण्यांमधून वेगवेगळे निष्कर्ष काढले जातात. माणसांच्या वापराच्या दृष्टीने सुरक्षित असल्याचं सिद्ध झाल्यानंतरच ती औषधं पुढे पाठवली जातात. नवी औषधं हा जुन्याच औषधांचा पुढचा टप्पा असतो. लोकांना लवकरात लवकर बरं वाटण्याच्या दृष्टीने त्यात बदल केलेले असतात. आजारपण दूर करण्यासाठी लोक औषधं घेतात. तर अनेकदा प्रतिबंध म्हणूनही औषधं घेतली जातात. औषधांचे विविध प्रकार आहेत. प्रतिजैविकं हा प्रकार चांगलाच प्रचलित आहे. बऱ्याच मुलांना प्रतिजैविकं दिली जातात. ही प्रतिजैविकं विविध प्रकारच्या बॅक्टेरियांशी लढू शकतात.

### आरोग्यमंत्र

## म्हणून हृदय जपा

हृदय हा सतत कार्यरत राहणारा महत्त्वपूर्ण अवयव आहे. हृदय दररोज ७,००० लीटर रक्त पंप करतं (यापैकी ७०% रक्त मेंदुसाठी लागतं आणि उर्वरित शरीराला ३०% रक्त मिळतं). हे रक्त ७०,००० किमी पेक्षाही लांब रक्तवाहिन्यांमधे प्रवाहित होत असतं. एक टन वजन ४२ फूट उंचीपर्यंत उचलण्यासाठी आवश्यक असते तितकी शक्ती हृदय त्याच्या कार्यातून दररोज निर्माण करत असतं.



आपण थकल्यावर आराम करतो पण हृदयानं अवघी ४ ते ५ मिनीटं आराम केला तरी आपला कायमचा आराम मिळू शकतो. अशाप्रकारे हृदय सतत कार्य करू शकते कारण ते अनुशासनाच्या आधारावर काम करतं. सामान्य परिस्थितीमधे हृदय ०.३ सेकंद आकुंचन पावतं तर ०.५ सेकंद प्रसरण पावतं. या हिशोबाने ०.३ + ०.५ = ०.८ सेकंदात हृदयाचा एक ठोका पूर्ण होतो म्हणजे एका मिनीटात ७२ ठोके होतात जे सामान्य असतात. आरामाच्या ०.५ सेकंदात अशुध्द रक्त फुफ्फुसात जाऊन १००% शुद्ध होऊन येतं. असं असताना काही कारणानं शरीराला कमी वेळात जास्त रक्तपुरवठ्याची गरज निर्माण झाली तर हृदय जास्त रक्त पंप करण्यासाठी आरामाची वेळ कमी करतं. अश्या परिस्थितीत आराम ०.४ सेकंद झाला तर हृदयाचा एक ठोका ०.७ सेकंदात पूर्ण होऊन दर मिनीटाला ही संख्या ८२ च्या वर जाते आणि केवळ ८०% च रक्त शुध्द होतं. हे वारंवार झालं तर शरीरावर त्याचे परिणाम दिसून येतात.

### पंचांग

**बुधवार, २६ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. १२, नक्षत्र: धनिष्ठा
चंद्रराशी : मकर, योग : सिद्ध,
सूर्योदय: ६.४०, सूर्यास्त: ६.४९

### फॉरवर्डस

**पहिलं प्रेम हे नेहमी पहिलं प्रेमच असतं...**

यकीन कर तेरे बाद हस हस के,
ठुकराए हैं मैने इश्क के कई मौके

### वाचा तर खरं

✻ गुलमर्ग– गुलमर्गचा अर्थ फुलांचा मार्ग. साठच्या दशकात गुलमर्गला बॉलीवूडची ओळख मिळाली. जम्मू काश्मीरच्या रमणीय प्रदेशात स्थित असलेलं गुलमर्ग विंटर स्पोर्टसाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी बॉबी, जब तक है जान, हैदर, ये जवानी है दिवानी अशा अनेक चित्रपटांचं चित्रिकरण झालं.

✻ मुन्नार– केरळमधील चहाच्या सुंदर मळ्यांची चित्रपट दिग्दर्शकांना भूरळ पडली नाही तर नवलच! केरळमधील मुन्नार इथं चेन्नई एक्सप्रेस, निशब्द, लाईफ ऑफ पाय, गुप्त या चित्रपटांचं चित्रकरण झालं आहे. मुन्नारला येण्याची योग्यवेळ ऑक्टोंबर ते मे आहे.

### करिअरवाटा

## व्हा व्यापारतज्ज्ञ

जग एक खेडं बनलेलं असताना, जगभर आस्थापनांच्या शाखा विकसित होत असताना त्यांचे व्यवहार हाताळण्यासाठी व्यावसायिक व्यवहारांची जाण असणाऱ्या कुशल कर्मचाऱ्यांची गरज असते. त्यामुळेच इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए करुन तुम्ही नानाविध संधी मिळवू शकता. ✻ इंटरनॅशनल बिझनेसच्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय व्यवसायासंबंधीची विविध कौशल्यं शिकवली जातात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर परदेशात व्यवसाय वाढवण्यासाठी गरजेचं ठरणारं सगळं ज्ञान मिळू शकतं. ✻ इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए केल्यानंतर विमान वाहतूक कंपन्या आणि रेस्तराँमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. यासोबत सरकारी कंपन्या आणि एनजीओही या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना संधी देतात. देशी–विदेशी बँका, पर्यटन कंपन्या, हॉस्पिटॅलिटी आदी क्षेत्रांमध्ये चांगली पॅकेजेस मिळू शकतात. ✻ या क्षेत्रात तगडं पॅकेज मिळू शकतं. ✻ इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड, जेके बिझनेस स्कूल, एशियन स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, सिंबायोसिस इन्स्टीट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यासारख्या संस्थांमध्ये तुम्ही इंटरनॅशनल बिझनेसचे धडे घेऊ शकता.



### खेचाखेची

## काय करावं?

**शिक्षक** : बंड्या मला सांग, रात्री डास चावले तर काय करायला पाहिजे?

.
.
.
.
.
.

**बंड्या** : काही नाही. खाजवून गप्प झोपायला पाहिजे. तुम्ही काय रजनीकांत नाही की त्याच्याकडून सॉरी म्हणवून घेऊ शकाल...!


### वेगळं काही

फ्रान्स आणि स्पेन या देशांच्या मध्ये असलेलं फँसेस हे बेट सहा महिने फ्रान्सकडे तर सहा महिने स्पेनकडे असतं. हे बेट ३०० चौरस मीटर परिसरात पसरलं आहे. फ्रान्स आणि स्पेनला वेगळं करणाऱ्या बिदाओसा नदीवर हे बेट वसलं आहे. फँसेस हे मानवनिर्मित बेट असून तिथे कोणीही रहात नाही. या बेटाला न्यूट्रल टेरीटरी असं म्हटलं जातं. १६५९ मध्ये फ्रान्स आणि स्पेन यांच्यात याच बेटावर युद्धबंदीबाबत चर्चा झाली होती. या दरम्यान शांतता करार करण्यात आला. यावेळी फ्रान्सच्या चौदाव्या किंग लुईसने स्पेनच्या चौथ्या किंग फिलिपच्या मुलीशी लग्न केलं. दोन्ही देशांच्या मध्ये असलेलं हे बेट वाटून घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

### हेअर केअर


## चलती ब्लॅकबेरी शेडची

एकीकाळी काळेभोर केस हे सौंदर्याचं लक्षण मानलं जात असे. आता मात्र केसांवर विविध रंगाचे कलर्स लावले जातात. या छटा केसांचं सौंदर्य खुलवतात



त्याचप्रमाणे पांढरे केसही लपवतात. अर्थात हे रंग आकर्षित करणारे असले तरी ते वापरताना बरीच काळजी घ्यावी लागते. मात्र फारशी काळजी घेण्याची गरज नसणारेही काही रंग आहेत. त्यात ब्लॅकबेरी शेडचा समावेश होतो. सध्या ब्लॅकबेरी हेअर कलरची चलती आहे. या रंगाची फारशी देखभाल करावी लागत नाही. त्याचा बेस तयार करण्यासाठी घातक रसायनांची गरज लागत नाही. ब्लीचिंगसाठी केसांच्या मुळांपर्यंत जावं लागत नाही. त्वचेच्या रंगानुसार यातील योग्य शेडची निवड केली जाते. बरेच हेअर स्टायलिस्ट हा रंग कस्टमाइज करून देतात. ब्लॅकबेरी आणि ब्लू या रंगसंगतीमुळे वेगळा लूक मिळतो. हा रंग प्रभाव पाडतो. केस पूर्णपणे हायलाईट करण्यापेक्षा बटांना हा रंग दिला असता खुलून दिसतो. नैसर्गिक काळ्या केसांऐवजी ब्लॅकबेरी बेस्ट ठरतो. त्यामुळे केस रंगवायच्या विचारात असाल तर ब्लॅकबेरीची निवड करा. हा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाची शान अनेक पटींनी वाढवेल याची खात्री बाळगा.

## शब्दकोडे क्रमांक १९०४




**आडवे शब्द :–**
१) अवस
४) ठराव, निश्चय
६) शहर, गाव
८) एक अधिक एक चतुर्थांश
१०) पुरुष
११) निराश
१२) किराणा मालाचा दुकानदार
१३) आई (इं.)
१४) प्रहार
१५) मोटार(इं.)
१६) दिवस
१८) धमनी
१९) जमेची खोटी बाब
२१) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२३) माल, पैसे मिळाल्याची चिठ्ठी
२५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
२६) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
२८) सुसर
३०) होडी
३१) कावळा
३२) भूपती
३३) प्रेत जाळण्याची चिता
३४) माल साठविण्याची जागा
३५) आकाश
३६) हिस्सा
३८) संपूर्ण
४०) तात्प्रर्यार्थ
४१) नशीब
४२) मार्ग
४३) भारवाहक
४५) कट्टा, ओटा
४८) सैन्याची तुकडी
५०) नवऱ्याचा भाऊ
५१) गयावया करणे
५६) पाळीपाळीने
५९) किंमत
६०) व्यर्थ
६१) धपाटा
६२) वृद्धत्व, थोडे
६३) एक द्विदल धान्य
६५) मालाची विक्री
६७) वर्ष, साल
६८) बैलाच्या मानेवरील जोखड
६९) एक सुगंधी पांढरे फूल
७२) शिकारीचा प्राणी
७३) एक सुगंधी वनस्पती
७५) शरीर
७६) अबोलीची वेणी
७८) नग्न
७९) बोकड
८०) पडसे
८१) हिरा, पाचू इ प्रकार
८२) मोठा नगारा

**उभे शब्द :–**
२) मनुष्य
३) नवरदेव
४) मडके
५) गवंडी
६) होकारच्या विरुद्ध
७) विटी कोलण्याचा खड्डा
८) घर
९) उत्तराधिकारी
११) खोबऱ्याची बर्फी
१२) सतरंजी
१४) नाश, वध
१५) कावळा
१७) महान
१९) नातवाची वा नातीची मुलगी
२०) पाणी
२१) वर्ष, साल
२२) तादाम्य, एकरूप
२४) वरपांगी
२६) हिशेबातील वांधा मिटविणे
२७) खटला
२९) मोजणी करणारा
३१) व्यवस्था, जबाबदारीचे काम
३७) एक श्वासरोग
३९) श्रीरामाचा एक भाऊ
४०) ✻✻ बुद्धी नाठी
४४) दडून बसणे
४५) कबूतर
४६) थोर मनाचा, धर्मात्मा
४७) दुसऱ्यांदा
४९) फळाचे साल
५२) ढग
५३) कधीही, केव्हाही
५४) दारूचा एक प्रकार
५५) चरण्याची जागा
५७) मोजकेपणा, मितता
५८) काचेला आरसा बनविणारा घटक
६३) कपि
६४) घट्ट
६५) डोक्यातला फोड .
६७) मनाचा झालेला ग्रह
६९) आम्रवृक्षाची मंजिरी
७०) संताप
७१) विश्रांती
७२) लाकडाचे एक उत्तम जात
७४) गंध
७७) उचलण्यास वजनदार

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## वरिष्ठ महिला आमंत्रितांच्या एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत नाशिकला गटविजेतेपद

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)** :– पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या राज्यस्तरीय वरिष्ठ महिला आमंत्रितांच्या अव्वल साखळी क्रिकेट (इन्व्हिटेशन सुपर लीग) स्पर्धेत नाशिक जिल्हा महिला संघाने सांगली व डीव्हीसीए क्लब, पुणे संघापाठोपाठ प्रेसिडेंट ११ वरदेखील उत्तम सांघिक कामगिरीने अतिशय चुरशीच्या लढतीत दोन गडी राखून विजय मिळवीत सुपर लीग मधल्या ब गटातदेखील लागोपाठ तीन विजयांसह अपराजित राहून लीग फेरीप्रमाणेच येथेही गटविजेतेपद मिळवीत चार संघांत पहिले स्थान मिळविले.

गोलंदाजीत रसिका शिंदे व पूजा वाघने प्रत्येकी २ बळी घेतले. तर फलंदाजीत तेजस्विनी बाटवाल, शाल्मली क्षत्रिय, कार्तिकी गायकवाड, प्रियांका घोडके व अनुष्का सोनवणे यांनी विशेष चमक दाखविली.

प्रेसिडेंट ११ ने प्रथम फलंदाजी करत सर्व बाद १७० धावा केल्या. त्यात साक्षी वाघमोडेने सर्वाधिक ६५ धावा केल्या.

गोलंदाजीत नाशिकतर्फे मध्यमगती रसिका शिंदे व ऑफ स्पिनर पूजा वाघने प्रत्येकी दोन, तर लक्ष्मी यादव व ऐश्वर्या वाघने प्रत्येकी एक बळी घेतला.

विजयासाठी १७१ धावांचा पाठलाग करणाऱ्या नाशिकच्या फलंदाजांनी ४३ व्या षटकांत लक्ष्य पार केले. यात तेजस्विनी बाटवाल ३४, शाल्मली क्षत्रिय ३३, कार्तिकी गायकवाड ३१, प्रियांका घोडके २७ व दहाव्या क्रमांकावरील अनुष्का सोनवणेच्या महत्त्वपूर्ण नाबाद १४ धावा अशी अतिशय सुरेख सांघिक कामगिरी करून नाशिक वरिष्ठ महिला संघास गडी राखून विजयी केले व आपली बाद फेरीतली आगेकूच कायम ठेवली.

प्रेसिडेंट ११ च्या शलाका काणे व व गौरी अहिरेने प्रत्येकी तीन बळी घेतले. अव्वल साखळी क्रिकेट–सुपर लीग – फेरीतील या गटविजेतेपदाबद्दल नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन विनोद शहा, सेक्रेटरी समीर रकटे यांनी वरिष्ठ महिला संघ व प्रशिक्षक भावना गवळी व डॉ. भाविक मंकोडी यांचे खास अभिनंदन करीत पुढील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

सभी शुभअंक संख्याशास्त्र, अंकशास्त्र और ज्योतिषशास्त्र पर आधारित है।

बुधवार
२६/३/२०२५
कल्याण शुभअंक

| २ | ५ | ७ |
|---|---|---|
| ३९० | २६७ | १२४ |
| ५७० | २३० | २२३ |
| २४ | ५७ | ७३ |
| २६ | ५९ | ७५ |

बुधवार
२६/३/२०२५
मुंबई शुभअंक

| ४ | ८ | ९ |
|---|---|---|
| २२० | ३५० | १८० |
| १३० | ४४० | २७० |
| ४६ | ८४ | ९१ |
| ४८ | ८६ | ९३ |

## छोटी जाहिरात

**ज्योतिष**

ज्योतिषशास्त्र, वास्तुशास्त्र व जन्मकुंडलीप्रमाणे. श्री प्रभू ज्योतिष ऋषी. **संपर्क : काश्यपी फ, मामा मुंगी कार्यालयामागे, पंपिंग स्टेशन, गंगापूर रोड, नाशिक. मो. नं. ७५०७००६३८६.**

**वाचकांना सूचना :–** भ्रमर वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्याची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल भ्रमर वृत्तपत्र जबाबदार राहणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

# थकित कर असलेल्या वाहनांचा जाहीर ई-लिलाव ४ एप्रिलला : राजश्री गुंड

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :** - प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथील मोटार वाहन कर न भरलेल्या व मोटार वाहन कायद्यातील विविध गुन्ह्यांच्या अंतर्गत जप्त केलेल्या वाहनांचा जाहीर ई-लिलाव दि. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता होणार असल्याची माहिती कराधान प्राधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजश्री गुंड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये दिली आहे.

लिलावासाठी असलेले वाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक, बस डेपो, सिन्नर, पंचवटी बस डेपो, नाशिक, त्र्यंबक पोलीस ठाणे, त्र्यंबक व पिंपळगाव बस डेपो येथील आवारात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. या कार्यालयातील वायुवेग पथकाने वेळोवेळी विविध गुन्ह्यांखाली अटकावून ठेवलेल्या वाहनांच्या वाहनमालकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर नोटीस पाठविण्यात आली आहे. मोटार वाहन कायदा १९८८ मधील तरतुदीनुसार वाहनमालकांनी पत्त्यातील बदल नोंदणी प्राधिकाऱ्यास कळविणे बंधनकारक असतानादेखील या वाहनांच्या मालकांनी या कार्यालयास तसे कळविलेले नाही. त्यासाठी हे प्रसिध्दीपत्रक जारी करण्यात येत आहे.

जाहीर ई-लिलावात एकूण ३४ वाहने उपलब्ध आहेत. यात ऑटोरिक्षा, टॅक्सी, बस व मालवाहू वाहने या संवर्गातील वाहनांचा समावेश आहे. लिलावाच्या तारखेपर्यंत वाहन कर व पर्यावरण कर भरण्याची संधी वाहन मालकांना राहील, याची संबंधित वाहन मालकांनी नोंद घ्यावी. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी दि. ३१ मार्च सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत www.eauction.gov.in या संकेतस्थळावर तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे २५ हजार रुपये रकमेचा (प्रत्येक लॉटकरीता) या नावाने अनामत धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) सह प्रत्यक्ष येऊन नावनोंदणीची पूर्तता करावी. जीएसटी नोंदणी धारकांनाच ई-लिलावात सहभागी होता येणार आहे. सविस्तर माहितीसाठी संबंधित व्यक्तींनी कार्यालयाशी संपर्क करावा.

ई-लिलावाच्या अटी व नियम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक, तसेच www.eauction.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. ही वाहने जशी आहेत तशी या तत्त्वावर जाहीर ई-लिलावाद्वारे विकली जाणार आहेत. कोणतेही कारण न देता लिलावातील वाहनांची संख्या कमी करण्याचे, हे जाहीर ई-लिलाव रद्द करण्याचे अथवा तहकूब ठेवण्याचे अधिकार उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तथा कर वसुली अधिकारी, नाशिक यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत, असेही प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# श्री काळाराम मंदिरात रविवारपासून वासंतिक नवरात्रोत्सव



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :** - दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री काळाराम मंदिरात चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याच्या दिवशी वासंतिक नवरात्रोत्सवास प्रारंभ होत आहे. यंदा हा नवरात्रोत्सव रविवार (दि. ३०) मार्च ते शनिवार (दि. ९) एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

या नवरात्रोत्सवात विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन श्री काळाराम मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना भाविकांसह नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन काळाराम मंदिर विश्वस्त मंडळाने केले आहे.

या नवरात्रोत्सवात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे साडेपाच वाजता श्रींची काकड आरती, सकाळी साडेआठ वाजता मंगल आरती, सकाळी १० वाजता माध्यान्ह पूजा, हभप नंदकुमार जोशी यांचे कीर्तन, दुपारी १ वाजता अध्यात्म रामायण संहिता पारायण, भागवतकार ह. भ. प. नरेश पुजारी, यजुर्वेद संहिता पठण-विविध वैदिक पाठशाळा, नाशिक, विविध भजनी मंडळांची भजने, सायंकाळी साडेसात वाजता शेजारती केली जाणार आहे.

वासंतिक नवरात्रोत्सवात रोज सायंकाळी साडेपाच वाजता व्याख्याने आयोजित करण्यात आली असून, रविवारी (दि. ३०) महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात प्राजक्त भट, गीतरामायण - भरतनाट्यम नृत्याविष्कार, सोमवारी (दि. ३१) डॉ. अनुजा जानवेलकर यांचे 'अध्यात्माकडे नेणारा राजमार्ग - क्रियायोग' या विषयावर व्याख्यान होणार आहे. मंगळवारी (दि. १) डॉ. दत्तात्रय तापकीर (पुणे) यांचे 'अध्यात्माची गंगा आणि विज्ञानाची यमुना' या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुधवारी (दि. २) दीपाली केळकर (अभंग लावण्य), गुरुवारी (दि. ३) पौर्णिमा ग्रुप (सुंदरकांड) सादर करणार आहेत. या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष, श्री काळाराम संस्थान, नाशिक तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनिलकुमार लोकवानी, विश्वस्त धनंजय पुजारी, मंगेश पुजारी, नरेश पुजारी, मंदार जानोरकर, डॉ. एकनाथ कुलकर्णी, ॲड. दत्तप्रसाद निकम, ॲड. दिलीप कैचे, सी. ए. शुभम मंत्री, शांताराम अवसरे, मिलिंद तारे या वर्षाचे मानकरी वंशपरंपरागत पूजाधिकारी हेमंतबुवा पुजारी यांनी केले आहे.

उत्सव कालावधीत रात्री ८ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात रविवारी (दि. ३०) मीना परुळकर- निकम, प्रियांका कोठावदे (भक्तिरंग), सोमवारी (दि. ३१) पूजा गायतोंडे, जर्मनी (भक्तिधारा), मंगळवारी (दि. १) सूरज बारी, ओंकार कडवे, आलिशा निमोणकर श्रावणी गिते, अमोल कुलकर्णी, वैष्णवी पगारे (नाशिकचे उगवते सूर), बुधवारी (दि. २) रोहित जंजाळे, केशव (केशव कथक नृत्यालय)-(नृत्याविष्कार) पल्लवी पटवर्धन व सहकारी (अवघा रंग एकची झाला), गुरुवारी (दि. ३) अजित कडकडे, मुंबई (गायन), शुक्रवारी (दि. ४) पंडित डॉ. अविराज तायडे (अभंगवाणी), शनिवारी (दि. ५) श्रुतिका शुक्ल, त्र्यंबकेश्वर, असावरी खांडेकर (चैत्रस्वर) सोमवारी (दि. ७) सायंकाळी ५.३० वा. सुमुखी अथणी, कीर्ती भवाळकर, अदिती पानसे (राम रंगीले - श्रीराम परिक्रमा).

**विशेष कार्यक्रम**

सोमवारी (दि. ३१) संकेत बरडीया आणि गिटार वर्ल्ड विद्यार्थी सामूहिक रामरक्षा संचलन- वे. शा. सं. भालचंद्र शौचे व पुजारी परिवार युवा वर्ग. सकाळी ६.३० वाजता, बुधवार (दि. २) तुलसी अर्चन सकाळी ७.३०, शुक्रवारी (दि. ४) सप्तमी महाप्रसाद दुपारी १२ रविवारी (दि. ६) दुपारी रामनवमी जन्मोत्सव, सायंकाळी ७ वाजता अन्नकोट महोत्सव, सोमवारी (दि. ७) श्रीराम याग सकाळी ७.३० वा., मंगळवारी (दि. ८) श्रीराम व श्री गरुड रथयात्रा दुपारी २.३० वाजता निघेल. तर बुधवार (दि. ९) उत्सव समाप्ती-मंत्रजागर-गोपालकाला सायंकाळी ७ वाजता होणार आहे.

# पंचवटी सार्वजनिक वाचनालयाचा शनिवारी वर्धापनदिन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** पंचवटी येथील ॲड. उत्तमराव नथुजी ढिकले पंचवटी सार्वजनिक वाचनालयाचा ५१ वा वर्धापनदिन सोहळा व त्या निमित्त पारितोषिक वितरण सोहळा गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला शनिवारी (दि.२९) वाचनालयाच्या सभागृहात संपन्न होणार आहे.

सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या सोहळ्यास मुख्य अतिथी म्हणून प्रसिद्ध कवयित्री, लेखिका प्रा. सुमती पवार तर आमदार ॲड. राहुल ढिकले विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्ष स्थान मविप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले हे भूषविणार आहेत, अशी माहिती वाचनालयाचे कार्यवाह ग्रंथमित्र नथुजी देवरे यांनी कळविले आहे.

याप्रसंगी आदर्श ग्रंथपाल म्हणून मविप्र मेडिकल कॉलेजचे ग्रंथपाल नितेश मते यांना तसेच वर्षभरात अधिकाधिक ग्रंथ वाचणारे वाचक, सभासद श्रद्धा गणोरे व रघुनाथ बोरकर यांना 'आदर्श वाचक' म्हणून गौरविले जाणार आहे. त्याचप्रमाणे अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना विविधि स्पर्धा परीक्षेत यश मिळवून यशस्वी झाल्याबद्दल सविता चिंतामण चौधरी (मुंबई पोलीस), भागिनाथ आबासाहेब महाले (आरोग्य सेवक), नयन दिगंबर पगारे (आरोग्य सेवक), योगिनी हरी कामडी (तलाठी), ऊर्मिला गौतम गाढवे (नाशिक पोलीस) आदी विद्यार्थ्यांना 'यशवंत-गुणवंत' विद्यार्थी म्हणून गौरविले जाणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वाचनालयाचे पदाधिकारी प्रा. डॉ. शांताराम रायते, ग्रंथमित्र नथुजी देवरे, हिरालाल परदेशी, धनंजय धनवटे आदींनी केले आहे.

# नाशिक जिल्ह्यात ३९६ ग्रामपंचायती क्षयरोगमुक्त

## जि. प. आरोग्य विभागाचे टी. बी. मुक्त पंचायत अभियान सुरू



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :** - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२३ मध्ये वाराणसी येथे टीबी मुक्त भारत या कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांच्या संकल्पनेनुसार टी. बी. मुक्त गाव हा जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग आणि जिल्हा क्षयरोग विभाग यांनी एकत्रितपणे नाशिक जिल्ह्यामध्ये टी. बी. मुक्त पंचायत अभियान राबवीत आहे, समाजामध्ये क्षयरोगाच्या आजाराविषयी गंभीरपणे जनजागृती व्हावी व आपला भारत देश आपला महाराष्ट्र आणि आपला नाशिक जिल्हा टी. बी. मुक्त व्हावा, यासाठी आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे.

जिल्ह्यात नियमितपणे राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येतो. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मार्गदर्शनानुसार सन २०२४ मध्ये जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात टी. बी. मुक्त गाव, माझी जबाबदारी या संकल्पनेतून १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत टी. बी. मुक्त ग्रामपंचायत अभियान राबविण्यात आले. यात १३८४ ग्रामपंचायतींपैकी ३९६ ग्रामपंचायतींनी क्षयरोगमुक्त होण्याचा मान मिळविला आहे. त्यापैकी कांस्य पदकाकरिता ३२४ तर रौप्य पदकाकरिता ७२ ग्रामपंचायत पात्र झाल्या आहेत.

जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व महात्मा गांधी यांची प्रतिमा व मूर्ती देऊन ग्रामपंचायत प्रतिनिधींना गौरविण्यात आले. या कार्यक्रमास जि. प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) डॉ. वर्षा फडोळ-बेडसे, उपसंचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे व इतर मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले, तसेच टी. बी. मुक्त ग्रामपंचायत सोहळ्यासाठी तालुक्याचे तालुका आरोग्य अधिकारी, टी. बी. मुक्त ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. टी. बी. मुक्त पंचायत अभियान हा उपक्रम आरोग्य विभागात काटेकोरपणे राबविल्याने ग्रामपंचायती टी. बी. मुक्त झाल्या. या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यात आशा कार्यकर्तीपासून सर्व आरोग्य कर्मचारी व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अधिकारी व कर्मचारी, सर्व क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी योगदान दिले. याप्रसंगी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक क्षयरोगदिनी रावसाहेब थोरात सभागृह (नवीन), जिल्हा परिषद, नाशिक येथे टी. बी. मुक्त ग्रामपंचायत अभियान पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत तालुकानिहाय ग्रामपंचायती टी. बी. मुक्त झाल्या आहेत. या वर्षात मोठ्या संख्येने ग्रामपंचायतींनी टी. बी. मुक्त पंचायत अभियानात सहभागी होऊन टी. बी. मुक्त होण्यासाठी पुढे यावे. क्षयरोग दुरीकरणासाठी सामूहिक प्रयत्न करावेत, आरोग्य विभागाने क्षयरोग निदान व उपचारासाठी आवश्यक प्रचार व प्रसिद्धी, तसेच क्षयरुग्णांसाठी फुड बास्केट या तीन मूलभूत संकल्पनांवर मोठ्या प्रमाणावर काम करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी यांनी केले आहे.

**टी. बी. मुक्त ग्रामपंचायत पुरस्काराचे निकष** - एक हजारामध्ये तीसपेक्षा अधिक संशयित रुग्णांची तपासणी. एक हजारामध्ये एकपेक्षा कमी रुग्ण. रुग्ण बरे होण्याचे ८५ टक्क्यांहून अधिक प्रमाण. ड्रग सेन्ससिटीविटी ६० टक्क्यांहून अधिक प्रमाण. क्षयरुग्णासाठी उपचारासह पोषण कीट व अन्य सुविधांची १०० टक्के उपलब्धता. क्षयरुग्णासाठी १०० टक्के निक्षय मित्र तयार करणे. पहिल्या वर्षी ब्राँझ, दुसऱ्या वर्षी सिल्व्हर व तिसऱ्या वर्षी सुवर्णपदक पुरस्कार दिला जातो.

# जिल्ह्यात १ एप्रिलपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी

**नाशिक (जिमाका) :-** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी राजेंद्र वाघ यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये नाशिक ग्रामीण जिल्हा (पोलीस उपायुक्त नाशिक शहर यांची हद्द वगळून) कार्यक्षेत्रात १८ मार्च २०२५ रोजी मध्यरात्रीपासून ते १ एप्रिल २०२५ रोजी रात्री २४ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे.

हे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा अंत्ययात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, तसेच सभा अगर मिरवणुका काढण्यास रीतसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही, असे प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशात नमूद केले आहे.

# नाशिक तालुका गट संसाधन केंद्राचा कायापालट

## जिल्हा परिषद व पंचायत समिती शिक्षण विभागाचा संयुक्त उपक्रम

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** समग्र शिक्षा अभियानांतर्गत नाशिक तालुका गट संसाधन केंद्रांचा इमारतीचा नाशिक तालुक्यातील शिक्षण विभागांतर्गत कार्यरत अधिकारी-कर्मचारी व शिक्षकांनी कायापालट केला. गटसंसाधन केंद्राचा प्रभावी वापर करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी मिशन आत्मनिर्भर उपक्रम सुरु केला. या उपक्रमांतर्गत गट संसाधन केंद्रांमध्ये भौतिक सुविधा उपलब्ध करून दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणात सहाय्यक करून दैनंदिन जीवनामध्ये त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात.

नाशिक पंचायत समितीच्या शिक्षण विभागांतर्गत तालुका गट संसाधन केंद्राचे कामकाज केले जात असून, नाशिक तालुक्याचे गट संसाधन केंद्र हे शासकीय कन्या शाळेच्या आवारात आहे. या गट संसाधन केंद्राचे बांधकाम सन २००५ मध्ये करण्यात आले होते. सद्यःस्थितीत गट संसाधन केंद्राची इमारत ही जीर्ण झाली असल्याने या इमारतीची डागडुजी होणे गरजेचे होते. मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी काही दिवसांपूर्वी या गट संसाधन केंद्रास भेट देऊन पाहणी केली असता त्यांनी नाशिक तालुक्यासह सर्व तालुक्यांतील गट संसाधन केंद्रांची कार्यक्षमता वाढविण्याचे निर्देश दिले होते.

या सूचनांनुसार शिक्षणाधिकारी डॉ. नितीन बच्छाव यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी यांना गट संसाधन केंद्रांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सहाय्यभूत असणाऱ्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या. या अनुषंगाने नाशिक पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी पंचायत समिती शिक्षण विभागातील अधिकारी, विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांची बैठक घेतली. यामध्ये गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी यांनी सर्वप्रथम स्वतः देणगी देऊन त्यानंतर तालुक्यातील सर्व शिक्षकांना देणगी स्वरूपात मदत करण्याचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत नाशिक तालुक्यातील गट संसाधन केंद्राच्या डागडुजी व भौतिक सुविधांसाठी तब्बल ६ लाख २ हजार ५०० रुपयांची वर्गणी जमा करण्यात आली.

या निधीतून इमारतीचे रंगकाम, आतील सजावट, विद्युतीकरण आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. विस्तार अधिकारी जगताप यांच्या संकल्पनेतून, शिक्षकांना एखाद्याच्या स्मरणार्थ खुर्ची देण्याचे आवाहन करण्यात आले होते. ज्यामुळे ९८ हजार रुपयांची रक्कम अतिरिक्त जमा झाली होती. यातून गट संसाधन केंद्रातील हॉलचे रूपांतर अत्याधुनिक हॉल आणि आयटीसी लॅबमध्ये करण्यात आले आहे. ही इमारत आता दिव्यांग विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी सज्ज झाली आहे, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी दिली.

# हाय सिक्युरिटी नंबर प्लेटसाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)**



:- हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यासाठी ३१ मार्च २०२५ पर्यंत निर्देश देण्यात आले होते. त्यास मुदतवाढ देत ३० एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्याचेही आदेश काढले होते; परंतु जुन्या वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्याचे काम कमी झाल्याने त्यास मुदतवाढ देण्यात आली असून दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचे प्रसिद्धिपत्रक परिवहन विभागाचे आयुक्त विवेक भीमनवार यांनी काढले आहेत.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी) बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार परिवहन विभागाच्या २३ डिसेंबर २०२४ रोजी परिपत्रकानुसार जिल्ह्यातील दि. १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित वाहनांच्या वाहनधारकांनी त्वरित आपल्या वाहनाची हाय सिक्युरिटी अंबर प्लेट नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही करावी, असे आदेश परिवहन कार्यालयातर्फे काढण्यात आले होते; परंतु जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्याचे काम फारच कमी प्रमाणात झाले असल्याने जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी अंबर प्लेट बसविण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात येत असल्याचे प्रसिद्धिपत्रक राज्याचे परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांनी काढले आहेत.

# पुंजाभाऊ ठाकरे यांना स्मृतिदिनी अभिवादन



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** औद्योगिक शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, चांदवड तालुका पंचायत समितीचे माजी सभापती लोकनेते पुंजाभाऊ ठाकरे यांना स्मृतिदिनी अभिवादन करत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महात्मानगर येथील औद्योगिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, अण्णासाहेब वैशंपायन विद्यालयात पुंजाभाऊ ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुंजाभाऊ ठाकरे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा दृष्टिकोन विशाल होता. त्यांनी आपल्या जीवनात अनेक विधायक उपक्रम राबविले. शाळा, महाविद्यालये व शिक्षण संस्था सुरू केल्या. गोरगरीब लोकांना आधार देण्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले, अशा शब्दांत मान्यवरांनी त्यांच्या कार्यपद्धतीचा गौरव करीत श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी इ. ६ वीचा विद्यार्थी प्रणव आंधळे, ज्येष्ठनेते पोपटराव कोल्हे, निलेश ढाकणे, दत्तात्रय आहेर आदींची पुंजाभाऊ ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देणारी भाषणे झाली. मुख्याध्यापिका राजलक्ष्मी शिंदे यांनी स्वागत व प्रास्तविक केले.

या प्रसंगी म्हाडा नाशिकचे अध्यक्ष रंजन ठाकरे, मंगला ढाकणे, अरुण ठाकरे, रिषीआनंद शिंदोरे, भगवानसिंग अहिरे, आनंद कोल्हे, ज्ञानेश्वर गर्जे, साहेबराव मोगल, उमेश कोल्हे, अशोक कदम, किरण वाळके, सीमा ठाकरे, वाळके, सोनार, अक्षय सोनवणे, राजेश लवांदे, नितीन सुकेणकर, सुजाता पगार, शाशिकांत देवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

यानिमित्ताने चित्रांचे राष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यात आले होते. यावेळी बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचा तसेच सोनार यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बावस्कर यांनी आभार मानले.

# अर्थव्यवस्थेची चौफेर प्रगती समाधानकारक : प्रकाश पाठक



**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** राष्ट्राचा विकास होण्यासाठी सर्व राज्यांचा विकास होणे गरजेचे आहे. प्रगत राज्यांचा विकास होत असताना काही प्रमाणात मागे पडलेल्या उत्तर-पूर्व राज्यांचा विकास साधत त्यांना मुख्य प्रवाहात जोडले जात आहे. चौफेर प्रगती साधताना भारतीय अर्थव्यवस्थेत समतोल राखला जात आहे, असे प्रतिपादन सीए व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रकाश पाठक यांनी केले.

लाडशाखीय वाणी मित्रमंडळ नाशिक यांच्या वतीने खुटवडनगर येथील माहेरघर कार्यालयात आयोजित 'अर्थविश्व - २०२५' या कार्यक्रमात ते बोलत होते. 'विकसित भारत' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. याप्रसंगी फार्मा उद्योजक उपेंद्र दिनानी, गुंतवणूक सल्लागार संदीप महाजन, अध्यक्ष गिरीश मालपुरे, समितीप्रमुख प्रसाद बागड, कुणाल मुसळे, सरचिटणीस विवेक वाणी, उपाध्यक्ष मितीन दहिवेलकर, नीलेश कोतकर, आर्किटेक्ट चंद्रकांत धामणे, गोविंद देव, अनिल कोठावदे, गिरीश महाजन, खजिनदार विजय मेखे, प्रशांत सोनजे, संध्या कोठावदे, रत्नाकर वाणी, संदीप शिरुडे, प्रभाकर कोठावदे, भूषण सोनजे, यांच्यासह लाडशाखीय वाणी मित्रमंडळ नाशिकचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, सल्लागार संचालक, विभागीय अध्यक्ष आदी उपस्थित होते.

सीए व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रकाश पाठक यांनी अर्थव्यवस्था, शेअर मार्केट आदी संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगितल्या. एखाद्या गरजू व्यक्तीला पैसे देऊन मदत करण्याचा प्रयत्न बहुतांश व्यक्ती करतात. त्यापेक्षा त्यांच्या हातांना काम देऊन कायमस्वरूपी समस्या सोडवणुकीवर भर देण्याचा सल्ला त्यांनी दिला.

कार्यक्रमात उपेंद्र दिनानी यांनी भारतीय अर्थव्यवस्था ५-१० ट्रिलियन :- मी व माझा व्यापार या विषयावर संवाद साधला. अर्थव्यवस्था, जीएसटी आणि इतर करप्रणाली समजावताना विविध उदाहरणे दिली. संदीप महाजन यांनी आर्थिक नियोजनाचे महत्त्व विशद केले. प्रास्ताविक कुणाल मुसळे आणि गिरीश मालपुरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. नीतू ब्राह्मणकर, डॉ. स्नेहल कोठावदे, पत्रमित्र दत्तात्रय कोठावदे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका शिनकर यांनी केले. कार्यक्रमादरम्यान संदीप महाजन (अर्थकला फायनान्शिअल) कुणाल कोठावदे (समर्थ केटरर्स), विनय कोठावदे (यूट्यूब रेकॉर्डिंग) तसेच समितीप्रमुख प्रसाद बागड, कुणाल मुसळे यांना सन्मानित करण्यात आले.

# मुलीस गावाला नेण्याच्या कारणातून पत्नीला मारहाण

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** मुलीला गावी नेण्यास प्रतिकार केला म्हणून संतापलेल्या पतीने चुलीजवळच्या लाकडाने पत्नीला दुखापत केल्याची घटना फुलेनगरजवळ घडली.

फिर्यादी शिवानी आकाश तुंबडे व आरोपी आकाश रमेश तुंबडे (दोघेही रा. फुलेनगर पाटाजवळ, पंचवटी) हे दोघे पती-पत्नी असून, मुलगी जान्हवीसह राहतात. राहत्या घरी झोपडीबाहेर स्वयंपाक करीत असताना आकाश तुंबडे घरी आला व पत्नीला म्हणाला, की मुलगी जान्हवी हिला मी गावी घेऊन चाललो आहे, असे म्हणून जान्हवीला पत्नीच्या हातातून हिसकावू लागला. तेव्हा पत्नीने त्याला प्रतिकार केला असता त्याने शिवीगाळ, मारहाण व दमदाटी केली, तसेच चुलीजवळ पडलेल्या लाकडाने पत्नीच्या डोक्याच्या पाठीमागे जोराने मारून दुखापत केली. या प्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार कोरडे करीत आहेत.

# अनहद फ्युजन ग्रुपचा वर्धापनदिन साजरा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** अनहद या फ्युजन ग्रुपचा दुसरा वर्धापनदिन पाश्चात्य व भारतीय वादन आणि नृत्याच्या अनोख्या संगमाने साजरा झाला. गंगापूर रोडवरील उदोजी महाराज एज्युकेशन हेरिटेज येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलनाबरोबर उदोजी महाराजांच्या पुतळ्यास अविराज तायडे, मकरंद हिंगणे, नितीन पवार, रघुवीर अधिकारी, विद्या देशपांडे, अनिल कुटे यांच्या हस्ते हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात अभिजात नृत्य नाट्य संगीत अकादमी प्रस्तुत पं. बिरजू महाराज रचित व गायलेली रचना श्रीकृष्ण निरतत थुंगथुंगा तौफिक कुरेशी यांची रचना सादर केली.

त्यानंतर अभिजात नृत्य नाट्य संगीत अकादमीच्या विद्यार्थिनींचे अभिजात नृत्य नाट्य संगीत अकादमी प्रस्तुत कथक आणि फ्युजन डान्स परफॉर्मन्स गुरू विद्याहरी देशपांडे यांच्या शिष्या अदिती भानोसे, श्रीप्रिया बाहेकर, मिताली काळे, ईशा निकम, शुभांगी साळवे, शॉयोंती तलवार यांनी केला. प्रचिती खरे यांचा सत्कार अनिता तोंडुलकर यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर अनहदच्या कार्यक्रमात प्रोजेक्ट अनहदमधील कलाकार अद्वय पवार (तबला), साहिल देशपांडे (कीबोर्ड), तपन बेडसे, समृद्ध (बासरी), केतन इनामदार (गायन), विधान बैरागी, क्षितिज डिंगोरे (गिटार), प्रतीक पंडित (सतार), प्रफुल पवार (केजोन) यांचा सत्कार शामकांत आचार्य यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी अनहदचे सादरीकरणाचा आरंभ राग भिन्न षड्जवर आधारित रचना, क्रॉस रोड्सची राग बागेश्री आणि ताल तीनतालमध्ये स्वरचित केलेला तराणा आणि इन्स्ट्रुमेंटल बंदिश यांचा संगम तसेच अभंग कृष्णस्तुती-रामस्तुती, श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे, गोविंद बोलो, अच्युतम् केशवम्, रघुपती राघव राजाराम सादर झाले. कार्यक्रमाची सांगता राग यमन आणि तीन तालमध्ये बंदिश, सवाल जवाब आणि जुगलबंदी झाली. निवेदन सुनेत्रा मांडगवणे यांनी केले. तसेच साऊंड लाईट सचिन तिडके यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच जयंत नाईक, नितीन वारे, सुनील देशपांडे, सुमुखी अथनी, श्याम आचार्य, सुनील कुटे, उद्धव अष्टुरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# छबूबाई आखाडे यांचे निधन

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी)**



:-पंचवटीच्या रामवाडीतील रहिवासी छबूबाई नामदेव आखाडे (वय ७४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुलगे, सुना, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते श्यामराव, संजय, रमेश आणि बाळासाहेब आखाडे यांच्या त्या मातोश्री होत.

# संपादकीय

## क्रिकेटप्रेमींसाठी मेजवानी

जगातील सर्वांत प्रसिद्ध आणि मोठ्या टी-२० लीगपैकी एक असणाऱ्या इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या सीझनला सुरुवात झाली. दि. २५ मे रोजी याच मैदानावर आयपीएल स्पर्धेतील अंतिम सामना खेळविण्यात येईल. आयपीएलमध्ये सहभागी होणाऱ्या संघामध्ये केवळ देशातीलच नाही, तर परदेशातील खेळाडूंचाही सहभाग असल्याने या स्पर्धेतील प्रत्येक सामना क्रीडाप्रेमींना मेजवानी देणारा असतो. आयपीएल स्पर्धेमुळे केवळ नावाजलेल्या खेळाडूंनाच नाही, तर ग्रामीण भागातील खेळाडूंनाही एक चांगले व्यासपीठ उपलब्ध आहे. आयपीएलच्या माध्यमातून अनेक खेळाडू मागील काही वर्षांत प्रकाशझोतामध्ये आले आहेत. त्यांच्या अर्थकारणालाही गती मिळाली आहे. मॅचफिक्सिंगच्या प्रकरणामुळे क्रिकेटकडून दुसरीकडे वळलेला वर्ग आयपीएलच्या सामन्यांमुळे पुन्हा क्रिकेटकडे वळू लागला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू एका नवीन कर्णधारासह आयपीएल २०२५ मध्ये प्रवेश करीत आहे. फ्रँचायझीने रजत पाटीदारकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपविली आहे. दुसरीकडे, कोलकाता नाईट रायडर्स हा गतविजेता आहे. यानंतरही संघाने आपला कर्णधार कायम ठेवला नाही. भारतीय संघाबाहेर असलेला अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे संघाची धुरा सांभाळेल. यावर्षी अनेक संघांना आपल्याला नवीन कर्णधार मिळाल्याचे पाहायला मिळाले. आयपीएल स्पर्धेला दि. २२ मार्च रोजी शुभारंभ झाला असला, तरी या स्पर्धेच्या आयोजनासाठी नोव्हेंबर २०२४ पासून सुरुवात झाली आहे. २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी आयपीएल २०२५ साठी मेगा लिलाव पार पडला होता. यात जवळपास १८२ खेळाडूंना फ्रेंचायझींनी संघात घेतले. या खेळाडूंनी गेल्या काही महिन्यांपासून आयपीएल २०२५ साठी सरावाला सुरुवात केली आहे. इंडियन प्रीमियर लीग २०२५ या जगप्रसिद्ध टी-२० लीगसाठी २४ आणि २५ नोव्हेंबर रोजी सौदी अरेबिया येथे मेगा ऑक्शन पार पडले. मेगा ऑक्शनमध्ये तब्बल ५७७ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यापैकी केवळ १८२ खेळाडू संघांनी विकत घेतले. या खेळाडूंना विकत घेण्यासाठी जवळपास ६३९.१५ कोटी रुपये फ्रेंचायझींनी खर्च केले. यंदाही स्पर्धेत १० संघांचा सहभाग राहणार आहे. या स्पर्धेमुळे केवळ खेळाडूंनाच नाही, तर संघमालकांनाही खऱ्या अर्थाने ग्लॅमर्स प्राप्त झाले आहे. सुरुवातीच्या काळात मुंबई इंडियन्सच्या संघमालक नीता अंबानी यांच्याकडेच फोकस असायचा. अर्थात त्याला कारणही तसेच होते. त्या एक तर देशातील आघाडीचे उद्योजक मुकेश अंबानी यांच्या त्या पत्नी आहेत. याशिवाय त्या सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. मुंबई इंडियन्सच्या प्रत्येक सामन्याला त्यांची उपस्थिती व खेळाडूंशी असलेली मैत्री व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यातील त्यांचा सहभाग यामुळे आयपीएल स्पर्धा म्हटल्यावर नीता अंबानी या नेहमीच चर्चेत राहिल्या आहेत; परंतु मागील आयपीएल स्पर्धेपासून नीता अंबानी या काहीशा पिछाडीवर पडल्या असून, इंडियन प्रीमियर लीगमधील सनरायझर्स हैदराबादच्या संघ मालक असलेल्या काव्या मारन यांचीच जोरदार चर्चा होत असते. काव्या मारन या स्वत: उद्योजिका असून, त्या स्वत: प्रत्येक सामन्याला हजर राहून खेळाडूंना प्रोत्साहित करत असतात. त्यांच्या सौंदर्याचीही चर्चा होत असून, सनरायझर्स हैदराबादचा सामना सुरू असताना कॅमेऱ्याचा अधिक फोकस खेळाडूंपेक्षा काव्या मारन यांच्यावरच अधिक असतो, असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. प्रभावी राजकीय आणि उद्योगपती कुटुंबातील सदस्य असूनही काव्या तिच्या खासगी लाईफबद्दल खूप प्रायव्हसी जपते. ती ३२ वर्षांची असून, संपूर्ण जग फिरली आहे; मात्र तरीही ती सोशल मीडियावर फारशी सक्रिय नाही. आयपीएलमधील सनरायजर्स हैदराबादशिवाय ती 'साऊथ आफ्रिका २० टूर्नामेंट' क्रिकेट लीगमधील 'सनराइजर्स ईस्टर्न केप' संघाची मालक आहे.

# डाऊन सिंड्रोमची लक्षणे असलेल्या बालकांची नियमितपणे तपासणी करावी : डॉ. चारुदत्त शिंदे



**नाशिक (जिमाका वृत्तसेवा) :-** डाऊन सिंड्रोम असणाऱ्या रुग्णांना आरोग्य, शैक्षणिक, कौटुंबिक व सामाजिक स्तरावर पाठबळाची आवश्यकता असते. त्यासाठी सर्वांनी सहकार्य केल्यास डाऊन सिंड्रोम असलेल्या रुग्ण सर्वसामान्यांप्रमाणे जीवन जगू शकतात. अशा रुग्णांच्या पालकांनी जिल्हा रुग्णालयातील शीघ्र हस्तक्षेप केंद्रात नियमितपणे तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी केले.

जन्मत: शरीरातील गुणसूत्रांच्या विभाजनात होणाऱ्या त्रुटीमुळे डाऊन सिंड्रोम हा आजार होतो. साधारणपणे ७०० नवजात बालकांमध्ये एक एवढे याचे प्रमाण आहे. २१ मार्च हा दिवस जगात डाऊन सिंड्रोम दिन म्हणून साजरा केला जातो. 'आमच्या समर्थन प्रणालीमध्ये सुधारणा करा', अशी या वर्षाची संकल्पना होती.

या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयात आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नीलेश पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप सूर्यवंशी, डॉ. अनंत पवार, बालरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रकांत सुरवसे, डॉ. नीलेश अहिरे, डॉ. मोहन वारके, जिल्हा बालरोगतज्ज्ञ असोसिएशनचे डॉ. सागर भालेराव, डॉ. अतुल बोंडे आदी उपस्थित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शिंदे म्हणाले, की जन्मत:च शरीरातील जनुकीय त्रुटींमुळे बालकांमध्ये डाऊन सिंड्रोम या आजाराची लक्षणे जाणवतात. त्यामुळे बौद्धिक व शारीरिक विकासात काही समस्या निर्माण होऊ शकतात. वैद्यकीय व्यावसायिक रक्ताच्या नमुन्यांद्वारे गुणसूत्रांची तपासणी करून या आजाराचे निदान करतात. जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्राच्या वतीने डाऊन सिंड्रोम असणाऱ्या बालकांची तपासणी करण्यात येते. त्यानुसार आवश्यक भौतिक उपचार केले जातात. डॉ. सुरवसे यांनी मार्गदर्शन केले. बालरोगतज्ज्ञ डॉ. अविनाश गोरे यांनी डाऊन सिंड्रोम याविषयीची माहिती सादर केली दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या कविता जुनेजा यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी डॉ. भालेराव, डॉ. शीतल पगार, डॉ. बोंडे यांनी व्याधीग्रस्त मुलांसाठी कविता सादर केली. डॉ. मधुरा धारणे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सारिका वाघ यांनी आभार मानले.

## सुकाकाथ मसाला

### दर्जा

सखाराम तिकीट न काढता डब्याला बाहेर लोंबकळून प्रवास करीत होता. तिकीट चेकर मुंदडांनी सखारामला पकडले आणि तिकिटाशिवाय प्रवास केल्याबद्दल दंडासकट साठ रुपये वसूल केले. मुंदडांनी पावती फाडली आणि एकदम काही आठवून त्यांनी आणखी दीडशे रुपये मागितले. ''हे कशासाठी?'' सखारामने विचारले, ''नवी दुरुस्त पावती देतो. तू ज्या खिडकीवर लोंबकळत होतास ती खिडकी फर्स्टक्लास डब्याची होती, हे माझ्या लक्षातच आले नाही,'' मुंदडांनी खुलासा केला.

– पानवाला

## खाण्यासाठी चेंज हवा?

### चिंचेचे पन्हे

**साहित्य:** – अर्धी वाटी गाभुळलेली, चिंचोके काढलेली चिंच, २ वाटया चिरलेला गूळ, १ चमचा जिरेपूड, चवीनुसार मीठ (आवडत असल्यास काळे मीठ घ्यावे)

**कृती:**– रात्री चिंच पाण्यात भिजत घालावी व सकाळी ती कोळून व गाळून घ्यावी. गाळलेल्या चिंचेच्या कोळात गूळ मिसळून तो विरघळू द्यावा व फ्रीजमध्ये ठेवावा. सरबत प्यायला देतांना ग्लासमध्ये थोडेसे कोळाचे मिश्रण घालून बाकी गार पाणी घालावे. चवीनुसार मीठ, जिरेपूड घालून, हलवून द्यावे. हें पन्हे पाचक व उष्णताशामक आहे. फक्त चिंच नवी असतानाच ते करावे त्यामुळे रंग व चव छान येते.

– **ऐश्वर्या राजेंद्र काळे**

## सोपे उपाय

- सरबतामध्ये साध्या साखरेऐवजी मध किंवा खडी साखर वापरावी.
- फळांचे सरबत करताना शक्यतो गराच्या दुप्पट साखर घालावी आणि गराएवढंच पाणी ठेवावं.
- सरबतामध्ये वेगवेगळे फ्लेवर देण्यासाठी बाजारी फ्लेवर्सपेक्षा वेलची, जायफळ, पुदिना व केशर यांसारखे घरगुती फ्लेवर्स घालावेत.

# देवळाली गाव येथे श्री गणेश मित्रमंडळातर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** देवळाली गाव येथे श्री गणेश मित्रमंडळ, मोहम्मदिया सोशल ग्रुप, पंचकमिटी व ग्रामस्थ देवळाली गाव यांच्या संयुक्त विद्यमाने देवळाली गाव येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मुस्लिम बांधवांनी पवित्र रमजाननिमित्त नमाजपठण करून सामुदायिकरीत्या उपवास सोडला.

रमजान महिन्यातील २३ व्या रोजाच्या निमित्ताने मोहम्मदिया चौक येथे सामूहिक इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात होते.

विशेष म्हणजे, या इफ्तार पार्टीत हिंदू आणि मुस्लिम समाज मोठ्या संख्येने सहभागी झाला, ज्यातून सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. एकत्र येऊन उपवास सोडण्याचा व धार्मिक सहिष्णुतेचा हा आगळावेगळा सोहळा उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

याच कार्यक्रमाच्या निमित्तने माजी नगरसेवक सूर्यकांत लवटे यांच्या प्रयत्नातून अंजुमन-ए-मोहम्मद येथे बोअरवेल जलपरी मशीन बसविण्यात आली. यामुळे स्थानिक रहिवाशांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे.

या इफ्तार पार्टीस शिवसेनेचे संपर्कप्रमुख राजू लवटे, श्याम खोले, माजी नगरसेवक हरिष भडांगे, प्रताप मेहरोलिया, स्वप्निल लवटे, गिरीश लवटे, अभिजित धोंगडे, कुमार पगारे, समीर शेख, युसूफ शहा, मोहम्मदिया सोशल ग्रुपचे अध्यक्ष इम्तियाज हाजी सय्यद, इमरान शेख, समीर सय्यद, फारुख पटेल, राजू तांबोळी, सरफराज सय्यद, रहीस शेख, समीर पटेल, मजहर शेख आदी उपस्थित होते. या उपक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे मजबूत नाते अधिक घट्ट झाले असून, देवळाली गावाने सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला आहे.


# मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' वेबरेडीओवर शैक्षणिक व्याख्यान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' या वेबरेडीओवर सुप्रसिद्ध मानसशास्त्र अभ्यासक प्रा. दत्तात्रय तापकीर यांचे 'ज्ञानरंगात रंगतो शिक्षक राजा' या विषयावर ऑनलाईन व्याख्यान संपन्न झाले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या संकल्पनेतून व विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या वतीने सुरू झालेल्या ऑनलाईन व्याख्यानमालेतील हे तिसरे पुष्प होते.

आपल्या व्याख्यानात प्रा. तापकीर यांनी उदाहरणे देत शिक्षकांची विविध गटांमध्ये वर्गवारी केली. शिक्षकांनी आपल्या कामास कार्यभार न मानता त्यास कार्यानंद मानले पाहिजे. शिक्षकाने आपल्या ज्ञानकक्षा उंचावण्यासाठी सतत श्रवण, वाचन, मनन, चिंतन व लेखन केले पाहिजे. विविध कलांच्या साहित्याची त्यास माहिती व आवड असली पाहिजे. नवनवीन कौशल्ये व तंत्रे शिकली पाहिजेत. त्यासाठी पूरक असणारे छोटे छोटे शिक्षणक्रम पूर्ण केले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या विविध शंका व प्रश्न यांना माहिती व प्रात्यक्षिकासह उत्तरे देता आली पाहिजेत. एकूणच शिक्षक हा विद्यार्थ्यास ज्ञानरंगात रंगलेला राजा वाटला पाहिजे, असे प्रा. तापकीर आपल्या व्याख्यानाच्या अखेरीस म्हणाले.

तत्पूर्वी महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी प्रस्तावनेत व्याख्यानमालेचे उद्दिष्ट स्पष्ट करीत सूत्रसंचालन केले. हे शैक्षणिक व्याख्यान सर्वांच्या श्रवणासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

## भ्रमर शब्दकोडे क्र. १९३



**उभे शब्द :** १) भारताचे नेहरू यांच्या नंतरचे एक माजी पंतप्रधान २) जवळीक, चिकटून राहणे ३) दिल्लीचे माजी मुख्यमंत्री ४) बड उलट लिहा ५) पंढरीला नियमित जाणारे भाविक ६) भारताचे माजी राष्ट्रपती-*** मुखर्जी ७) बोलावण्यासाठी दिलेली साद ८) डाळ शिजताना होणारा आवाज ११) बे पंचे १३) श्रीरामाने या सेनेच्या मदतीने लंकेवर विजय मिळवला १७) मेंदू १८) वास, गंध २०) राक उलट लिहा २२) भित्रा, भ्याड २४) किंमती ऐवज, वस्तू २५) पाकचे माजी पंतप्रधान-*** शरीफ २६) आश्चर्य ३१) नवा कोरा, न चुरघळलेला ३२) खर्चात केलेली बचत ३४) लग्नातील नवरी मुलगी ३५) एक म्हण-** करी काम ३६) आकाशात उंचावरून घिरट्या मारणारा पक्षी ३८) उन्हाळा (इंग्रजीत) ४०) सर्व (हिंदीत) ४१) पाण्यात विहरणारा एक सफेद रंगाचा पक्षी ४२) जरचा साथीदार ४४) सभोवताली घातलेला गर्दीचा वेढा ४६) श्रवणेंद्रिय ४७) पक्ष्याचे पंख, परंतु (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) भाजपचे वाजपेयी यांच्या जोडीचे तत्कालीन मुख्य नेते ६) नारायण राणे यांचे वृत्तपत्र ९) घराची तुळई १०) ताणला जाणारा लवचिक पदार्थ ११) मजबूत १२) तंबाखू वा इतर साहित्य ठेवण्याची छोटी पिशवी १४) हव्यास, स्वार्थी भावना १५) दहा गुणिले नऊ १६) सायकलचे चाक, कागदी दस्त्यांचे माप १८) वर्गातील मुलांची एकूण संख्या १९) वाढदिवशी हा कापतात २१) एक भाजप नेते-नितीन **** २३) श्रीविष्णू पत्नी, लक्ष्मी देवी २५) समोर झालेली दृष्टीभेट २७) निवडणुकीत उमेदवाराला हे दान करतात, व्होट २८) पांघरण्याचे उबदार वस्त्र २९) भाविकांचे पंढरपूरला पायी जाणे ३०) एक म्हण-बडा घर *** वासा ३२) रात्री चमकणारा किटक ३३) पटकन, लगेच ३६) डोंगरातील वळणाचा रस्ता ३७) लहान बाळाला ही टोचतात ३९) शपथ (हिंदीत) ४१) प्रगती, भरभराट ४३) पैसे (इंग्रजीत) ४४) श्रीमंतच्या विरूध्दार्थी शब्द ४५) राज्य चालविणारे शासन ४७) भाकरी थापण्याची मोठी थाळी ४९) रंग (इंग्रजीत) ५०) याची धाव कुंपणापर्यंत अशी एक म्हण आहे ५१) भारताची राजधानी

### शब्दकोडे क्र. १९२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | रं | ग | बा | र | णे | | बि | हा | र | | जा |
| मा | ग | | ल | स | | प | ट | क | न | | ल |
| न | | गा | भा | | ज | ड | | | र | वि | ना |
| यो | | व | र | दा | न | | भा | त | | ना | |
| गी | ता | | ती | | ता | स | गा | व | | य | न |
| | प | सा | | मा | | म | का | | स | क | स |
| च | ट | ई | | क | स | | र | | ड | | |
| ह | | बा | ल | प | ण | | | लो | क | स | भा |
| ल | | बा | ग | | | स | द | न | | | र |
| | पा | | ब | ग | दा | द | | | च | पा | ती |
| जी | व | ल | ग | | द | रा | र | | र | न | |
| त | | ता | | चो | र | | वा | र | स | | मे |

# रोटरी क्लबतर्फे विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप




**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :-** रोटरी क्लब ऑफ नाशिकचा ८० वा वर्धापनदिन उत्साहात आणि अविस्मरणीय उपक्रम व प्रकल्पांनी साजरा करण्यात आला. याप्रसंगी विविध शाळांतील गरजू विद्यार्थिनींना ८० सायकलींचे वाटप करण्यात आले. मुलींना सायकल मिळाल्याने आता खेडोपाडी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना आता शाळेत जाणे सोपे होणार आहे. त्यामुळे शिक्षक, पालक व विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. संदर्भ हॉस्पिटलमध्ये अपघात विभागात होणारी अडचण लक्षात घेऊन दोन व्हीलचेअर तेथील डॉक्टरांना हस्तांतरित करण्यात आल्या. मुख्य सोहळ्यात सहस्रचंद्रदर्शन मंत्रोच्चारांच्या घोषात रोटरी क्लबचे संस्थापक नारायणराव विंचूरकर यांच्या प्रतिमेचे त्यांच्या चौथ्या पिढीतील नातवाच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ नाशिकच्या सर्व उपस्थित माजी अध्यक्ष व नाशिकमधील ज्येष्ठ रोटेरियनचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे प्रांतपाल राजेंद्रसिंग खुराणा व उपप्रांतपाल ओंकार महाले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीवंदना व नृत्य गणेशवंदनेने करण्यात आली. रोटरी क्लब ऑफ नाशिकच्या ८० वर्षांच्या वाटचालीचा आढावा दृक्श्राव्य चित्रफितीच्या माध्यमातून सोनाली चिंधडे यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन डॉ. श्रिया कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली मंथलीडर्स डॉ. गौरी कुलकर्णी, पराग जोशी व अन्य सहकाऱ्यांनी केले. याप्रसंगी 'रोटरीनामा' या स्मरणिकेचे प्रकाशन मुख्य अतिथींच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा राजपूत यांनी केले. ८० सायकलींच्या वाटपाच्या नियोजनात विजय दिनानी, डॉ. विश्वजित दळवी, विजय दीक्षित व सुधीर वाघ यांनी भाग घेतला व परिश्रम घेऊन सायकली लाभार्थींना पोहोचविण्याचे नियोजन केले. अध्यक्ष ओमप्रकाश रावत यांनी मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाची प्रस्तावना माजी अध्यक्षा डॉ. श्रिया कुलकर्णी यांनी केली. यांप्रसंगी माजी प्रांतपाल दादा देशमुख, रमेश मेहेर, राजीव शर्मा आणि रोटरी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिव शिल्पा पारख यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय बुलबुल हीरक पंख चाचणी शिबिर संपन्न



**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी) :-** महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट्स आणि गाईड्स राज्य कार्यालयामार्फत नाशिक जिल्हा कार्यालय येथे राज्यस्तरीय बुलबुल हीरक पंख चाचणी शिबिर संपन्न झाले. या चाचणी शिबिरात जिल्ह्यातील ११८ बुलबुल विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

शिबिरप्रमुख तथा जिल्हा गाईड संघटक कविता वाघ यांच्या नेतृत्वात पार पडलेल्या या राज्यस्तरीय बुलबुल हीरक पंख चाचणी शिबिरात जिल्ह्यातील अभिनव बालविकास मंदिर, गंगापूर रोड, अभिनव बालविकास मंदिर उत्तमनगर, सिडको, बाल विद्यामंदिर, नाशिक, वाघ गुरुजी बालशिक्षण मंदिर, नाशिक, प्राथमिक विद्यालय, उंटवाडी, डे केअर सेंटर प्राथमिक शाळा, नाशिक, कमलावती कोठारी मुलींची प्राथमिक शाळा, जेलरोड, रचना विद्यालय प्राथमिक विभाग, शरणपूर रोड, बालशिक्षण मंदिर, गोरेराम लेन, एस. जी. पब्लिक प्राथमिक मराठी स्कूल सिन्नर, सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर, नाशिक या शाळांमधून ११८ बुलबुल विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. सहभागी विद्यार्थिनींची दोन दिवस लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक स्वरूपाची चाचणी घेण्यात आली. हीरक पंख चाचणी उत्तीर्ण होणाऱ्या बुलबुल विद्यार्थिनींना राज्यस्तरीय प्रमाणपत्र व प्रावीण्यपदक प्राप्त होते. या चाचणी शिबिराकरिता सहाय्यक परीक्षक म्हणून मनीषा आहेर, विजया दुधारे व वर्षा चौरे यांनी कार्य केले. या चाचणी शिबिराच्या समारोपाप्रसंगी जिल्हा गाईड प्रशिक्षण आयुक्त डॉ. लक्ष्मी कस्तुरे, जिल्हा स्काऊट संघटक श्रीनिवास मुरकुटे, कब मास्तर बापू चतुर आदी उपस्थित होते.

## लैंगिक छळ करणाऱ्या सावत्र पित्यावर हल्ला

**मुंबई (भ्रमर वृत्तसेवा) :-** नालासोपारा येथे सावत्र वडिलांकडून होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला कंटाळून तरुणीने सावत्र पित्यावर चाकूने हल्ला केल्याची घटना घडली आहे.

सावत्र पित्याकडून वारंवार होणाऱ्या अत्याचाराला कंटाळून तरुणीने सावत्र पित्यावर चाकूने हल्ला करीत त्याला जखमी केले आहे. या मुलीने तिच्या सावत्र बापाच्या गुप्तांगावर आणि संपूर्ण शरीरावर चाकूने वार केल्याने आरोपी सावत्र पिता जखमी झाला आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नालासोपारा पूर्वच्या बावशेत पाडा परिसरात ही घटना घडली आहे. सावत्र पित्याने आपल्यासोबत दुष्कर्म केल्याचा आरोप त्या तरुणीने केला आहे.

# नाशिकमध्ये एफडीएच्या छाप्यात २३९ किलो भेसळयुक्त पनीर जप्त

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** गुढीपाडवा तसेच रमजान ईद सण येणार असल्याने या सणांमध्ये विविध दुध व दुग्धजन्यपदार्थ जसे की पनीर, खवा, मावा आदी खाद्य पदार्थांची प्रचंड मागणी असते.

ही बाब लक्षात घेऊन नागरिकांना दर्जेदार, सकस अन्न पदार्थ मिळावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आवश्यक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर अंबड येथील एका दुकानावर छापा मारून शेकडो किलो पनीर अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केले आहे

अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे अंबड परिसरामध्ये असलेल्या मे. साई एंटरप्रायजेस, प्लॉट नं. ३०८, साईग्राम कॉलनी या पेढीमध्ये बनावट पनीर विक्रीसाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यावरुन अन्न व औषध प्रशासन विभागाने या पेढीची तपासणी करून पेढीमध्ये विक्रीसाठी आढळलेला संशयित पनीरचा २३९ किलो ग्रॅम इतका साठा जप्त करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाने या साठ्यामधून पनीर या अन्न पदार्थाचा नमुना विश्लेषणासाठी घेऊन तो प्रयोगशाळेकडे तपासणी कामी पाठविला आहे. तसेच जप्त करण्यात आलेला संशयित पनीरचा साठा हा नाशवंत असल्याने व तो परत खाण्याच्या उपयोगात येऊ नये याकरिता त्यावर नीळ टाकण्यात येऊन हा साठा अन्न व औषध प्रशासनाकडून महानगरपालिकेच्या घंटागाडीत नष्ट करण्यात आला.

या छाप्यातील पनीरचा नमुना विश्लेषणासाठी पाठविण्यात आला असून, विश्लेषण अहवाल प्रलंबित आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच संबंधितावर अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ नुसार पुढील कारवाई घेण्यात येईल.

ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी संदीप तोरणे, सुहारा मंडलिक यांनी सहायक आयुक्त (अन्न) विनोद धवड यांच्या उपस्थित व सहआयुक्त (अन्न) महेश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.



एफडीएची पथके शहरातील पनीर उत्पादक व विक्रेते यांच्यावर लक्ष ठेवणार असून कधीही, अन कुठेही जाऊन तपासणी करणार आहेत. अन्न सुरक्षा व मानके कायदा, नियमानुसार निर्गमित करण्यात आलेल्या परवाना अटींचे उल्लंघन होता कामा नये, तसेच बनावट पनीरसारखे अनुचित प्रकार घडू नये यासाठी अन्न व औषध प्रशासन तत्पर आहे, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहआयुक्त दि. ज्ञा. तांबोळी यांनी दिली.

सण–उत्सव काळात पनीर, पेढे, बर्फी, मिठाई आदी खरेदी करताना ते दुधापासून बनविले असल्याबाबत खात्री करून खरेदी करण्याची दक्षता घ्यावी, तसेच भेसळयुक्त अन्नपदार्थासंदर्भात, तक्रार तसेच काही गोपनीय माहिती प्राप्त झाल्यास प्रशासनास त्वरित टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ यावर संपर्क करावा, असे आवाहन देखील तांबोळी यांनी केले आहे

# पाणी फाऊंडेशनचा विस्तार महाराष्ट्रात करणार : अमीर खान

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** राज्य शासनाच्या वतीने सन २०१६ पासून वीस शेतकरी व १०० एकर जमीन असेल, तर गटशेतीला आतापर्यंत एक कोटी रुपयांचे अनुदान देण्यात येत होते. आता राज्य सरकार गटशेतीचे नवे धोरण आणणार असून, आर्थिक मदत वाढवू. त्यातून गटशेतीला आपण आंदोलनाचे स्वरूप देऊ, अशी महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

बालेवाडी येथील शिवछत्रपती शिवाजी क्रीडा संकुलात येथे पाणी फाऊंडेशनच्या वतीने आयोजित 'सत्यमेव जयते शेतकरी चषक २०२४'च्या भव्य पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अमीर खान व किरण राव यांनी स्थापन केलेली ही संस्था सन २०१६ पासून दुष्काळमुक्त व समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे काम करीत आहे.

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, सह्याद्री फार्म्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विलास शिंदे, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासह अमीर खान, किरण राव आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोरंजन आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक सेलिब्रिटींनी या कार्यक्रमात ग्लॅमरची भर घातली. यावेळी मान्यवरांनी सर्व सहभागी शेतकरी गटांचे कौतुक केले, तसेच त्यांनी त्यांच्या एकतेचे कौतुक केले आणि शेतीमुळे निर्माण झालेल्या अनिश्चितता आणि आव्हानांचा सामना करण्यासाठी शेतीतील सामूहिकीकरण कसे महत्त्वाचे आहे, यावर भर दिला.

यंदाच्या शेतकरी चषक स्पर्धेत महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांतील ४,३०० पेक्षा अधिक शेतकरी गटांनी (सुमारे २००० महिला गट) भाग घेतला. यात सांगली जिल्ह्याच्या तासगाव तालुक्यातील तेरती या गावातील 'भाग्योदय शेतकरी गट' संघाने राज्य पातळीवरील प्रथम पारितोषिक पटकावत २५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक, तसेच प्रतिष्ठेची शेतकरी चषक ट्रॉफी जिंकली. सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यातील भोसरे येथील सरसेनापती प्रतापराव गुजर महिला शेतकरी गट आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या खुलताबाद तालुक्यातील सोबलगाव या दोन संघांना संयुक्तरीत्या १५ लाख रुपयांचे राज्य पातळीवरील द्वितीय पारितोषिक देण्यात आले. तर हिंगोली जिल्ह्यातील कवडा (ता. कळमनुरी) येथील जय बिरसा मुंडा शेतकरी गट आणि वाशिम जिल्ह्याच्या मंगरूळपीर तालुक्यातील नागी येथील माऊली शेतकरी गटाने संयुक्तरीत्या १० लाख रुपयांचे तृतीय पारितोषिक जिंकले. सर्व महिला गटांना दोन राज्यस्तरीय पारितोषिके आणि तालुकास्तरीय प्रत्येकी ५० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाणी फाऊंडेशनच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि अखिल महाराष्ट्र स्पर्धेचे अधिकृतरीत्या उद्घाटन केले. शाश्वत पाणी व शेती पद्धतीतील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांनी सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. जमिनीवर मोठ्या प्रमाणावर बदल घडवून आणण्यासाठी फाऊंडेशनसोबत सकारात्मक सहकार्य सुरू ठेवण्याची कटिबद्धताही त्यांनी व्यक्त केली.



# स्विगीच्या बोल्टकडून नाशिकमध्ये फूड डिलिव्हरीत वाढ

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** स्विगी, या भारतातील अग्रगण्य ऑन–डिमांड सुविधा प्लॅटफॉर्मने आज नाशिकमध्ये बोल्ट बाय स्विगीच्या मागणीत अभूतपूर्व वाढ झाली आहे. ही जलद अन्न वितरण सेवा शहरातील जेवणाच्या पद्धतीत बदल घडवून आणत असून मासिक तत्त्वावर (एमओएम) ऑर्डरमध्ये २२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे रेस्टॉरंट्सना त्यांचा व्यवसाय वाढविण्यास मदत झाली आहे.

स्विगीच्या बोल्टने आपल्या सुपर–स्मार्ट बॅकएंड ऑप्टिमायझेशनमुळे १० मिनिटांत ताजे अन्न पोहोचविण्याचे वचन पूर्ण केले आहे. नाशिकमधील ३५ टक्के रेस्टॉरंट्स आधीच उपलब्ध असल्याने खाद्यप्रेमी नाश्ता, दुपारचे जेवण, स्नॅक्स, रात्रीचे जेवण या सर्वांसाठी ७,००० हून अधिक पदार्थांमधून निवड करू शकतात. हे पदार्थ प्रचंड वेगाने वितरित केले जातात. मुख्य म्हणजे, बोल्टच्या एकूण ऑर्डरपैकी ४० टक्के ऑर्डर रात्रीच्या जेवणाच्या असून २७ टक्के ऑर्डर दुपारच्या जेवणाच्या आहेत.

स्विगीचा बोल्ट हा केवळ वेगाने डिलिव्हरी करत नाही तर त्याचे ऑपरेशन्स स्मार्ट आहेत व ग्राहकांना आनंदी बनवतो. रेस्टॉरंट्समध्ये ठरलेल्या कामाच्या पद्धतीमुळे प्रतीक्षेचा कालावधी कमी होऊन पुनरावृत्ती होणाऱ्या ऑर्डरमध्ये लक्षणीय वाढ दिसून येत आहे. सागर स्वीट्स, डेअरी डून, मुघल दरबार आणि काका दा ढाबा सारखे प्रसिद्ध स्थानिक ब्रँड बोल्टचा फायदा घेत आहेत आणि त्यांच्या दैनंदिन ऑर्डरमध्ये वेगाने वाढ झाली आहे. त्यामुळे बोल्ट हा एक महत्त्वाचा महसूल निर्माता ठरला आहे.

स्विगीच्या फूड मार्केटप्लेसचे मुख्य व्यवसाय अधिकारी सिद्धार्थ भाकू यांनी बोल्टच्या वाढत्या यशाबद्दल बोलताना सांगितले, की बोल्ट खरोखरच सोयीची व्याख्या नव्याने करून उद्योगात नवीन मानके स्थापित करीत आहे. नाशिकसारख्या उदयोन्मुख शहरांमध्ये त्याचा जलद अवलंब फूड डिलिव्हरीतील वेग व कार्यक्षमतेची वाढती मागणी दर्शवितो.

तंत्रज्ञान व लॉजिस्टिक्सचे एकत्रीकरण करून बोल्ट रेस्टॉरंट्सना ताजे, उत्तम दर्जाचे जेवण देण्यास मदत करत आहे आणि ग्राहकांना त्यांचे आवडते जेवण विक्रमी वेगाने मिळेल याची खात्री करत आहे.

बोल्ट आमच्या रेस्टॉरंट भागीदारांसाठी ऑर्डर वाढविणारा म्हणून सिद्ध होत आहे. हे ब्रँडना त्यांचा नफा वाढविण्यासाठी एक माध्यम देण्याच्या आमच्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे.

# 'सवंगडी'च्या रंगात रंगले स्पर्धक

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** सवंगडी संस्था, नाशिकतर्फे रंगपंचमीच्या निमित्ताने 'चेहरा रंगवा' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुलांसह त्यांच्या पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

यशवंत व्यायामशाळा, महात्मा गांधी रोड येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धा सर्वांसाठी खुली व नि:शुल्क होती. १२ वर्षांआतील व १२ वर्षांपुढील अशा दोन गटांत ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेसाठी निसर्ग व क्रीडा असे विषय देण्यात आले होते. स्पर्धकांनी आपल्या जोडीदारांच्या चेहऱ्यांवर पोस्टर, वॉटर व ॲक्रेलिक रंग वापरून निसर्गातील सौंदर्य व खेळांतील विविध साहित्यांना आपल्या कलात्मकतेने रंगविले. स्पर्धक चित्र रंगविण्यात तल्लीन झाले होते.

नाशिकमधील चित्रकार तथा कलाशिक्षक अतुल भालेराव यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या हस्ते दोन्ही गटांतील प्रत्येकी पहिल्या तीन विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. संस्थेने गतवर्षीपासून सुरु केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून, यामुळे विशेषत: मुलांना स्वत:ची कला वेगळ्या पद्धतीने साकारण्यासाठी एक वेगळे व्यासपीठ मिळाल्याचे प्रतिपादन भालेराव यांनी यावेळी केले.



स्पर्धकांनीही या स्पर्धेतून वेगळा आनंद मिळाल्याचे मनोगतातून सांगितले. संस्थेचे अध्यक्ष दीपक बैचे यांनी प्रास्ताविक, पदाधिकारी संगीता हिंगमिरे यांनी स्वागत व सूत्रसंचालन केले, तर संस्थापक अध्यक्ष नितीन हिंगमिरे यांनी आभार मानले. संगीता हिंगमिरे व साधना बैचे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. संस्थेचे उपाध्यक्ष मंगेश भुसारे, पदाधिकारी सविता भुसारे, वेदिका हिंगमिरे व गौरी बैचे यांनी स्पर्धा यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :** लहान गट – श्लोक नेरकर (प्रथम), विनित विसपुते (द्वितीय) व दीक्षा पाटील (तृतीय) मोठा गट – स्वाती नेरकर (प्रथम), दक्षता सेनभक्त (द्वितीय) व लब्धी देढिया (तृतीय).

# महाराष्ट्राच्या दिल्लीवरील मोठ्या विजयात ईश्वरी सावकारच्या शानदार ७९ धावा

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** ईश्वरी सावकारने बीसीसीआयच्या स्पर्धेत महाराष्ट्रातर्फे २३ वर्षांखालील महिला क्रिकेट संघातर्फे खेळताना उपांत्यपूर्व फेरीच्या महत्त्वाच्या सामन्यात दिल्लीवरील विजयात ८९ चेंडूंमध्ये आठ चौकारांसह ७९ धावा फटकावत महाराष्ट्राला उपांत्य फेरीत नेण्यात प्रमुख वाटा उचलला.

आसाममधील गुवाहाटी येथे झालेल्या एकदिवसीय सामन्यात दिल्लीने प्रथम फलंदाजी करत नऊ बाद २३६ धावा केल्या. त्यात तनिशा सिंग व श्वेता शेरावतने अर्धशतके केली. महाराष्ट्रातर्फे खुशी मुल्लाने चार, तर ईशिता खळेने दोन व ईशा पठारेने एक गडी बाद केला. विजयासाठी २३७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना खुशी मुल्ला ४१ व ईश्वरी अवसरे ३६ यांनी महाराष्ट्राला ६८ धावांची सलामी दिली.

त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या नाशिकच्या ईश्वरी सावकारने ७९ धावा करीत महाराष्ट्राला २२५ पर्यंत असे लक्ष्याच्या अगदी जवळ नेऊन ठेवले. तिला चौथ्या क्रमांकावरील यष्टीरक्षक भाविका अहिरेने नाबाद ६२ धावा करून सुरेख साथ दिली व महाराष्ट्राला सात गडी राखून मोठा विजय मिळवून देत रुबाबात उपांत्य फेरीत नेले.

# शॉक लागून तरुणाचा मृत्यू

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नांदगाव शहरातील कृष्णाई मंगल कार्यालयाचे संचालक अक्षय बाळू खैरनार यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना घडली असून, यामुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



मालेगाव रोडवरील शहरातील कृष्णाई मंगल कार्यालयाचे संचालक अक्षय खैरनार (वय २५) यांना उच्च दाबाच्या विजेचा धक्का लागला असता त्यांना येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

उपचारादरम्यान अक्षय खैरनार यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, यामुळे नांदगाव शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# नाशिकरोडला ४० रिक्षांवर कारवाई; ८ रिक्षा स्क्रॅप

**नाशिकरोड (भ्रमर प्रतिनिधी):–** नाशिकरोडसह शहरात काही रिक्षाचालकांची बेशिस्त वर्तणूक आणि महिलांप्रती गैरवर्तनाच्या तक्रारी वाढल्या होत्या. प्रवाशांसोबत होणाऱ्या गैरवर्तणुकीच्या घटना तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या रिक्षांवर आळा घालण्यासाठी नाशिकरोड पोलिसांनी दंड थोपटले असून रिक्षा चालकांवर धडक कारवाई केली आहे. या कारवाईबाबत नाशिकरोड शहर वाहतूक शाखा अनभिज्ञ असल्याचे दिसून आले.

नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या आवारात झालेल्या कारवाईत ४० रिक्षांवर कारवाई करण्यात आली असून, यातील ८ रिक्षा विनापरवाना रस्त्यावर चालत असल्याने त्यांच्यावर कारवाई करून परिवहन विभागाच्या स्वाधीन करण्यात आल्या. तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३० रिक्षांवर दंडात्मक कारवाई करत १५,२०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. याशिवाय, वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या २ रिक्षाचालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ताब्यात घेतलेल्या रिक्षांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नाशिकरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांनी नाशिकरोड शहर वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कर्मचाऱ्यांची मागणी केली असता दोन कर्मचारी साधनांसह दंड आकारणीसाठी कारवाईत सहभागी झाले. ही विशेष कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णिक आणि उपायुक्त मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी, तसेच पोलीस उपनिरीक्षक माळी, पवार आणि काकडे यांच्यासह २५ पोलिसांच्या पथकाने सक्रिय सहभाग घेतला. रिक्षाचालकांकडून प्रवाशांना अरेरावी, महिला प्रवाशांबरोबर अशोभनीय वर्तन आणि वाहतुकीस होत असलेला अडथळा लक्षात घेऊन पोलिसांनी ही कठोर कारवाई केली आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वाहन चालकांनी वाहतूक आणि नैतिक नियमांचे पालन करावे, अन्यथा आणखी कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरी यांनी दिला आहे.



## भुयारी गटार व....

(पान १ वरून) :– प्रक्रियेला ब्रेक लागला होता. तसेच माजी प्रशासन उपायुक्त घोडे पाटील यांच्याकाळात बांधकाम विभागात जम्पिंग प्रमोशन झाल्याने काहीजण न्यायालयात गेले होते. एकूणच या प्रक्रियेत मोठे अडथळे निर्माण झाले होते, मात्र नवीन आयुक्त म्हणून मनीषा खत्री यांनी पदभार स्वीकारल्यानंतर रखडलेल्या पदोन्नतीचा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कागदपत्र, तांत्रिक बाबी व सेवा ज्येष्ठता या निकषांची पडताळणी करत पदोन्नती प्रक्रिया पूर्ण केली. महिनाभरापूर्वीच मनपा महासभेवर पदोन्नतीचा विषय मंजुरीसाठी ठेवला जाणार होता. परंतु काही कारणास्तव तो मागे घेण्यात आला होता. आता हा विषय अखेर मार्गी लागला आहे.

# हिंदू एकता आंदोलन पक्ष व शहीद भगतसिंग क्रांती दल मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** शहीददिन आणि शिवजयंतीच्या निमित्ताने हिंदू एकता आंदोलन पक्ष व शहीद भगतसिंग क्रांती दल मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, शहीद भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून आणि आदरांजली वाहून करण्यात आली.

समता ब्लड बँक, नाशिकच्या सहकार्याने या रक्तदान शिबिराचे आयोजन झाले. यावेळी ५० पेक्षा जास्त रक्त पिशव्या संकलन करण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हिंदू एकता आंदोलन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, शीख समाजाचे गुरुमुखसिंग बिल्ला, अमरिकसिंग नागी, करणसिंग गिल, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोपरगावचे प्राचार्य सुभाष जाधव, महाराष्ट्र कातारी शिकलकर समाजाचे सरचिटणीस सुरेश पवार, प्रसाद बावरी (विशेष कार्याधिकारी), प्रसाद बावरी (उपाध्यक्ष – शहीद भगतसिंग क्रांती मंडळ), किरणसिंग पवार, तसेच सुनील परदेशी, अनिल जाधव, शाम पवार, करणसिंग बावरी, संजय परदेशी आदी उपस्थित होते.

यावेळी प्रियांका अहिरराव, मंगला पवार, प्रीती पवार–बावरी (मॅनेजर, फूड कॉर्पोरेशन), सोनू चव्हाण, शनी अहिरे, मोहन पवार, रविसर पवार, रोहित टिपले, भूषण जगदाळे, सूरज पत्रकार, विजय पवार, प्रसाद बावरी, किरण पवार, तिवारी यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.

यावेळी रक्तदात्यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, तसेच समता ब्लड बँकेच्या सपना नवले, उज्ज्वला आहेर, गायत्री घोटेकर व राहुल आहिरे यांचादेखील सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रतापसिंग पवार, बाळासाहेब मोरे, गुरुदेव पवार, भूषण सदभैया, जिवा पवार, श्रवण खर्डे, त्रिदेव, उमेश पाटील, स्वप्नील काथवटे, मिल्खा सिंग व रतनसिंह यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# शहरातील विविध रस्त्यांसाठी पुन्हा १६ कोटींच्या कामांना मान्यता

## महापालिका : पंधरा दिवसापूर्वीच २६ कोटींच्या कामांना दिली होती मंजुरी

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने शहरातील विविध भागांत रस्ते कॉंक्रिटीकरण, डांबरीकरण व दुरुस्तीच्या कामांसाठी तब्बल सोळा कोटींच्या कामांना मंजुरी दिली आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली महासभा घेण्यात आली. यावेळी महासभेने विविध विभागांतील रस्ते कामांचे प्रस्ताव ठेवले असता त्यास मंजुरी देण्यात आली. पावसाळ्यानंतर यापूर्वी ज्या ठिकाणी खड्ड्यांवर दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधींचा खर्च केलेला होता, पुन्हा त्याच ठिकाणी नव्याने रस्ते बांधून कोट्यवधींचा खर्च करण्याचा घाट पालिकेकडून घातला जात असल्याचा आरोप अनेकदा केला जातो. शहरातील खड्डे दुरुस्तीसाठी कोट्यवधींची तरतूद अंदाजपत्रकात केली जाते. महानगरपालिका दरवर्षी या तरतुदीतील निधीचा उपयोग रस्ते दुरुस्तीवर करत असते. मात्र पावसाळ्यात दर्जाहीनकामामुळे खड्ड्यांचे साम्राज्य शहरभर दिसून येते. पावसाळ्यात डांबरीकरणाचे काम शक्य नसल्याने माती मुरुम टाकून मलमपट्टी केली जाते. सध्या शहरातील वेगवेगळ्या भागात रस्त्याची दुरुस्ती व्हावी. याकरिता प्रस्ताव पालिकेकडे येऊ लागले आहे. शहरातील विविध भागांतील कॉलनीअंतर्गत रस्ते, मुख्य रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण व कॉंक्रिटीकरणासाठी बांधकाम विभागाने दि. ११ मार्च रोजीच २६ कोटींची कामे महासभेवर ठेवली असता त्यास मंजुरी मिळाली होती. दोन आठवड्यात पुन्हा सोळा कोटींची कामे केली जाणार असून, रस्त्यांवर एकूण चाळीस कोटींहून अधिक खर्चाचा बार उडविला जाणार आहे.

# भाजप कामगार आघाडी उत्तर महाराष्ट्र सरचिटणीसपदी व्यंकटेश मोरे

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** नाशिक जिल्ह्यातील युवा, उत्साही



नेतृत्व व्यंकटेश मोरे यांची भारतीय जनता पार्टीच्या कामगार आघाडी उत्तर महाराष्ट्र सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप कामगार आघाडी उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रताप शिंदे यांनी पुढाकार घेऊन पुण्यातील भाजप कामगार आघाडीच्या मुख्य कार्यालयात प्रदेशाध्यक्ष ॲड. विजय हरगुडे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. भाजपची कामगार आघाडी ही कामगार, चालक, मालक यांच्या हितासाठी काम करणारी संघटना आहे. औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न सोडवणे, समन्वय साधणे आणि कामगारांचा आवाज बुलंद करणे हे या आघाडीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या नियुक्तीनंतर आ. सीमा हिरे, आ. प्रा. देवयानी फरांदे, आ. ॲड. राहुल ढिकले, शहराध्यक्ष प्रशांत जाधव, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, प्रदेश सरचिटणीस रम्मी राजपूत, नाशिक कामगार आघाडीचे उपाध्यक्ष डॉ. तुषार जगताप, शहराध्यक्ष हेमंत नेहेते यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांनाशुभेच्छा दिल्या.

# आदिवासी महिलांना शासकीय सवलती द्या : भीमशक्ती संघटना

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनात मागणी करण्यात आलेली आहे, की महाराष्ट्र शासनाच्या वतीने आदिवासी व इतर महिलांना विविध योजनांच्या अंतर्गत मासिक अनुदान देण्यात येत असते; परंतु या प्रकरणी मागील पाच ते सहा महिन्यांपासून जिल्हाधिकारी कार्यालयात कामे प्रलंबित असून, आदिवासी महिला शासकीय लाभांपासून वंचित आहेत, अशी माहिती भीमशक्ती संघटनेचे प्रवक्ते अविनाश आहेर यांनी दिली.

विधवा महिलांसाठी दिली जाणारी संजय गांधी योजनेचे अनुदान नाशिक जिल्ह्यातील त्याचप्रमाणे आदिवासी तालुक्यातील महिलांना मिळालेले नाही. त्याचप्रमाणे श्रावणबाळ योजनेअंतर्गत ज्या आदिवासी महिलांनी फॉर्म भरले आहेत, त्यांना स्थानिक पातळीवरील तलाठी व तहसीलदार अपेक्षित सहकार्य करताना दिसत नाहीत. जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्तिश: लक्ष देऊन या प्रकरणी त्वरित निकाल काढण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आलेली आहे. नियोजित वेळेत संबंधित प्रकरणात लाभार्थींना लाभ न मिळाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आलेला आहे. या प्रसंगी अविनाश आहेर, भारती चित्ते, पांडू खोटरे–राजेवाडी, संजय सानप, नाना पवार, सनी खरे, रतन आढाव, रघुवीर नायक, मिलिंद बहाळकर व शाम ओझरकर हे मान्यवर उपस्थित होते. या निवेदनावर अविनाश आहेर, सुरेश पवार, राम ठाकूर, डॉ. श्यामकुमार दुसाने, जितेंद्र केल्हे, नीलिमा साठे, रेणुका कोकणे, छाया बिडलॉन, रमेश पाथरे, मिलींद बहाळकर, रघुवीर नायक, रतन आढाव, सनी खरे, रंजना नेरकर, सविता खैरनार, सविता आव्हाड, डॉ. शाम ओझरकर, नामदेव गायकवाड, सनी खरे, स्वप्नील गोवर्धने, अंजली वैद्य, सौ. किरण पाटील, ज्योती गोसावी आदी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# हिंदू समाजाच्या वतीने नागपूर येथील पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांचा तीव्र निषेध

**लासलगाव (भ्रमर वार्ताहर) :–** नागपूर येथे जिदादी मानसिकतेच्या गुंडांनी पोलिसांवर दगडफेक केली, तलवार व कुऱ्हाडीने हल्ला केला. यामध्ये अनेक पोलीस गंभीर जखमी झाले. त्यामध्ये महिला पोलिसांचादेखील समावेश होता, उपायुक्त स्तराचे वरिष्ठ पोलीस अधिकारीदेखील गंभीर जखमी झाले होते.

या निंदनीय प्रकाराचा लासलगाव येथील हिंदू समाजाच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. खाकीवर हात टाकणाऱ्या जिहादी समाजकंटकांवर कडक कारवाई. करावी, असे निवेदन चिराग जोशी, मयुर झांबरे, यश शर्मा, विकी काळे, अभिजित साखरे, अभिजित सोनवणे व प्रदीप शिकलकर यांनी लासलगाव पोलीस कार्यालयाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांना दिले.

या प्रसंगी महाराष्ट्र पोलीस दलाच्या पाठीशी सकल हिंदू समाज ठामपणे उभा आहे. संविधान व कायदा व सुव्यवस्था वारंवार पायदळी तुडविणाऱ्या जिहाद्यांना या देशाचा कायदा मान्य करावाच लागेल. हिंदू समाजदेखील आंदोलन करतो, आपल्या मागण्या मांडतो, हिंदूंच्यादेखील भावना तीव्र असतात; पण हिंदू समाज कधीही कायदा हातात घेत नाही. संविधानाच्या चौकटीत राहून आपले म्हणणे मांडतो. आपल्या वर्तणुकीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ देत नाही.

कारण हा सभ्य व कायद्याचा आदर असणारा समाज आहे, असे निवेदनात म्हटले आहे.



लासलगाव येथील हिंदू समाजाच्या वतीने नागपूर घटनेचा तीव्र निषेध करून कडक करावी, असे निवेदन लासलगाव पोलिस कार्यालयाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांना देताना चिराग जोशी, मयुर झांबरे, यश शर्मा, विकी काळे, अभिजित साखरे, अभिजित सोनवणे व प्रदीप शिकलकर.

● **नाशिक :–** गुढीपाडव्याचा सण चार–पाच दिवसांवर येऊन ठेपला असताना खरेदीसाठी नाशिककर हळूहळू गर्दी करताना दिसून येत आहेत. विशेषकरून गुढीसाठी लागणारे हार आणि कंगन यांची खरेदी मोठ्या प्रमाणात सुरू आहे.

# कोणत्याही क्षेत्रात एकत्रपणे काम केल्यास स्वप्नपूर्ती शक्य : जि.प.सीईओ आशिमा मित्तल

## मुलींच्या निरीक्षणगृहात गुंज फाऊंडेशनतर्फे अभ्यासिका व वाचनालय कक्षाची उभारणी

**नाशिक (प्रतिनिधी):–** लहान मुलांवर आई–वडील संस्कार करतात. त्या मुलांना पालकांचे प्रेम मिळते. मात्र समाजात आई–वडिलांपासून वंचित असलेल्या मुलांसाठी आम्ही प्रशासकीय अधिकारीच आई–वडील म्हणून जबाबदारी पार पाडत आहोत. मला स्वतःला अनाथ, वंचित मुलांसाठी कार्य करायला आवडते. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांपासून प्रशासकीय पदावर काम करताना मी जयपूर, नागपूर, अहिल्यानगर, पालघर आणि आता नाशिक या ठिकाणी अशा मुलांच्या संस्थांमध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधते. त्यांना मदत करते. बालगृह आणि मुला–मुलींचे निरीक्षण गृहातील मुलांसाठी मी आठवड्यातून एक दिवस वेळ देते. सर्वांनी मिळून एकत्रपणे सामाजिक व कोणतेही काम केल्यास स्वप्नपूर्ती शक्य होते, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

त्र्यंबक रोडवरील बालगृह आणि मुला–मुलींचे निरीक्षण गृह येथे गुंज फाउंडेशनच्या वतीने अभ्यासिका कक्ष आणि वाचनालय उभारण्यात आले असून या दोन्ही कक्षांचे उद्‌घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रतिमा गेडाम यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मित्तल बोलत होत्या. याप्रसंगी मित्तल पुढे म्हणाल्या की, बालगृह, मुला–मुलींचे निरीक्षणगृह या ठिकाणी मुलामुलींवर चांगले संस्कार होत असून त्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. या मुलांसाठी मी दर आठवड्याला वेळ देते. माझे कुटुंब देखील माझ्या अशा उपक्रमामध्ये सहभागी होते. सध्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत जि. प. शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविण्यात येतात. त्यात प्रामुख्याने स्पेलिंग बी या उपक्रमाच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. या ठिकाणी देखील स्पेलिंग बी उपक्रम राबविण्यात येत आहे . मुलांनी इंग्रजीला घाबरून न जाता इंग्रजी शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे आणि भविष्यात आपले करिअर घडवावे, असेही मित्तल यांनी सांगितले. डॉ. प्रतिमा गेडाम यांनी मनोगत व्यक्त करताना संस्थेचे मानद सचिव चंदुलाल शहा यांच्या कार्याचा तसेच गुंज फाउंडेशनच्या उपक्रमाचा गौरव केला. तसेच या वंचित मुलांना आई–वडील नसले तरी त्यांचे अनेक पालक येथे उपस्थित आहेत. या मुलांनी मित्तल यांचा आदर्श घेऊन जीवनात वाटचाल करावी, पुस्तकांना आपले मित्र बनवावे. खूप मेहनत करावी, आजच्या काळात सर्वच क्षेत्रात संधी आहे. नृत्य, कला, क्रीडा अशा आपापल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडवावे, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना निरीक्षणगृहाचे मानद सचिव चंदुलाल शाह यांनी सांगितले की, या संस्थेच्या गेल्या ४८ वर्षांपासून मी मानद सचिव म्हणून काम पाहत असून ही संस्था म्हणजे केवळ होस्टेल नव्हे तर अनाथ किंवा पालक नसलेल्या मुलामुलींना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत असतो. अनेक सामाजिक संस्था संघटना तसेच व्यक्तींकडून या संस्थेला वेळोवेळी मदत मिळते. एका संस्थेकडून संगणक देण्यात आले. त्याचप्रमाणे गुंज फाउंडेशनच्या वतीने एक अभ्यासिका कक्ष आणि एक वाचनालय कक्ष उभारणीसाठी ५० हजार रुपयांचा निधी देण्यात आला असून त्याचे उद्‌घाटन झाले. या संस्थेसाठी जिल्हा परिषदेच्या सीईओ मित्तल नेहमीच मदत करीत असतात. दर आठवड्याला त्या एक तास या ठिकाणी मुलांशी येऊन संवाद साधून त्यांना शिकवतात. त्यांच्या अशा कार्याबद्दल त्यांना राज्य शासनाच्या वतीने बालस्नेही पुरस्कार मिळाला आहे. अशा चांगल्या व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या लोकांमुळेच निरीक्षणगृहासारख्या संस्थेचे काम चांगल्या प्रकारे चालते, असेही चंदुलाल शाह यांनी स्पष्ट केले. या ठिकाणी मुला–मुलींवर चांगल्या प्रकारे संस्कार करण्यात येतात. सहा ते अठरा वयोगटातील वंचित व अनाथ मुला–मुलींची येथे व्यवस्था करण्यात येते. या संस्थेतून बाहेर पडलेली अनेक मुले–मुली आज चांगल्या पदावर कार्यरत आहेत. तसेच येथे राहून शिक्षण घेणारे अनेक मुले–मुले ही डिप्लोमा आणि आयटीआयचा कोर्स करत आहेत, असेही त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या संस्थेतून बाहेर पडलेल्या सात मुलींची लग्न आम्ही करून दिली असून त्यांचे केवळ कन्यादानच केले असे नव्हे तर त्या मुली आता आमच्याकडे हक्काने माहेरपणासाठी येतात, असेही भावनोद्‌गार शाह यांनी यावेळी काढले. यापूर्वी अनेक प्रशासकीय अधिकारी आणि काही शासकीय अधिकाऱ्यांच्या पत्नी यांनी येथे मुलांना शिकविण्याचेही काम केले, असेही चंदुलाल शाह यांनी सांगितले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना गुंज फाउंडेशनचे सचिव संदीप गोयल म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात मुलांचा जास्त वेळ मोबाईल बघण्यामध्ये जातो. परंतु या ठिकाणी वाचनालय सुरू केल्याने मुलांचा कल वाचनाकडे जाऊन त्याचा निश्चितच फायदा होणार आहे. या वाचनालयासाठी आणखी पुस्तके आम्ही देऊ, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी गुंज फाउंडेशनचे अध्यक्ष अमर कलंत्री यांनी सांगितले की, गुंज फाउंडेशनच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात येतात. या ठिकाणी अभ्यासिका आणि वाचनालय सुरू करून एक प्रकारे समाज उपयोगी काम उभे राहिले आहे. यापूर्वीही गेल्या दहा वर्षात गुंज फाउंडेशनने अनेक समाज उपयोगी कामे केल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी देखील आम्ही मदत करण्यास तयार आहोत. तसेच वैद्यकीय क्षेत्रातही आम्ही काम करु इच्छितो आम्हाला संधी द्यावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी अभ्यासिका तसेच वाचनालयाचे फीत कापून उद्‌घाटन करण्यात आले. याप्रसंगी मुलींनी अभ्यासिकामध्ये लावलेल्या विविध वैज्ञानिक चित्रांबद्दल मान्यवरांना माहिती दिली. यावेळी कोमल कलंत्री यांनी आशिमा मित्तल यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. तर रितू गोयल यांनी प्रतिमा गेडाम यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी गुंज फाउंडेशनचे अध्यक्ष अमर कलंत्री यांचा आशिमा मित्तल यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेतील मुलींनी स्वागत गीत सादर केले. तसेच नृत्यावर आधारित सुंदर योगा डान्स सादर केला. हितेश शाह यांनी आभार मानले. याप्रसंगी कार्यक्रमास गुंज फाउंडेशनचे सचिव संजय गोयल, खजिनदार अखिल राठी, डॉ. मुकेश अग्रवाल, ॲड. चैतन्य शाह, अजित गुप्ता, सचिन शाह, अमित गुप्ता, विकी कपूर, तरुण गुप्ता, शैलेश गुप्ता, रितू गोयल, पायल राठी, दिपाली गुप्ता, अंजना गुप्ता आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.




## अंबड घरकुल येथे वॉलमधून पाण्याची गळती

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी):–** तीन दिवसांपासून सिडकोसह शहर परिसरात नागरिकांना पिण्यापुरतेही पाणी मिळत नसल्याने भटकंती करावी लागत असताना, दुसरीकडे अंबड घरकुल येथे वॉलमधून पाण्याची गळती होत असून हजारो लीटर पाणी वाया गेले.

नाशिक महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सिडकोतील प्रभाग क्रमांक २७ मधील घरकुल योजनेच्या पाठीमागे वॉलमधून मोठ्या प्रमाणात पाणीगळती झाली. महानगरपालिकेच्या वतीने गेल्या तीन दिवसांपूर्वी दुरुस्तीच्या कामासाठी एक दिवसाचा पाणीपुरवठा होणार नसल्याचे जाहीर केले होते. मात्र, यानंतरही दोन दिवस अधिक झाले, तरीही सिडकोवासीयांना सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. महापालिका पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी वॉल्व्हमन यांच्यात समन्वय नसल्याने अनेकदा काही भागांत मुबलक तर काही भागात अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा केला जातो. या पाइपलाइनच्या माध्यमातून घरकुलासह दत्तनगर आणि परिसरातील नागरिकांना पाणीपुरवठा केला जात असून, मनपाने वॉल्व्हमधून होत असलेली पाणीगळती त्वरित थांबवावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली असून यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## नाशिक महापालिका व नववर्ष स्वागत यात्रा समिती यांच्यावतीने होणार नववर्षाचे स्वागत

**नाशिक (भ्रमर प्रतिनिधी) :–** हिंदू नववर्षाचा पहिला दिवस, अर्थातच गुढीपाडवा, भारतीय संस्कृतीत 'चैत्र शुद्ध प्रतिपदा' हा दिवस 'महापर्व' म्हणून साजरा करण्याची परंपरा आहे. गुणगौरव न्यास संचलित, नववर्ष स्वागत यात्रा समिती, नाशिक मनपा यांच्या तर्फे या हिंदू नववर्षाचे स्वागत ढोल–ताशांच्या गजरात आणि शोभायात्रांच्या जल्लोषात साजरा करण्याची परंपरा आहे.

यावर्षी देखील अशाच प्रकारे नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात येणार आहे, अशी माहिती अध्यक्ष शिवाजी बोन्दार्डे आणि सचिव जयेश क्षेमकल्याणी यांनी दिली.

यानिमित्त २७ मार्च रोजी पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसैन यांना समर्पित ''अंतर्नाद'' (१५०० हुन अधिक विद्यार्थ्यांचे हिंदुस्थानी शास्त्रीय गायन, नृत्य, वादन कलेचे सादरीकरण, सायंकाळी ६.३० वाजता), २८ मार्च रोजी महारांगोळी पुण्यश्लोक अहिल्या देवी होळकर यांना समर्पित २० हजार स्क्वे.फूट रांगोळी, सकाळी ७ वाजेपासून), २९ मार्च रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान स्मरण दिनानिमित्त शिवकालीन शाखांचे प्रदर्शन आणि शंख कलांचे सादरीकरण प्रात्यक्षिक सायंकाळी ६.३० वा.) ३० मार्च रोजी शहरातल्या विविध भागातून सकाळी ७ वाजता शोभायात्रा होणार असून, पाडवा पटांगण (जुने भाजी पटांगण), गोदाघाट, पंचवटी, या ठिकाणी हे सर्व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

यावर्षी २८ मार्च रोजी महावादन (१००० ढोलांचे समूह वादन, सायंकाळी ६.३० वाजता), छत्रपती संभाजी क्रीडा संकुल अश्विननगर येथे होणार आहे. याकरिता महावादनातील सर्व सहभागी वादक, अंतर्नाद मधील सर्व गुरु व सर्व शिष्य आणि त्यांचे पालक, महारांगोळीच्या सर्व सहभागी महिला, शिवकालीन विविध प्रकारचे शंख व त्यांचे प्रात्यक्षिक दाखवणारे गुरुकुलाचे लखन जाधव गुरुजी आणि त्यांचे विद्यार्थी स्वयंसेवक यांचा सराव सुरु आहे.

हा सण उत्साहाने साजरा करण्यासाठी नाशिककरांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नाशिक महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद आणि नववर्ष स्वागत यात्रा समितीचे अध्यक्ष शिवाजी बोन्दार्डे, उपाध्यक्ष चंद्रशेखर जोशी, प्रफुल्ल संचेती, राजेश दरगोडे, जयंत गायधनी, राजेंद्र नाना फड राजेश मालपुरे यांनी केले आहे.

### सांस्कृतिक कार्यक्रमांचे स्वरूप

शहराच्या सर्व भागातून व स्तरातून १०० पेक्षा जास्त महिला एकत्र येऊन सुमारे २० हजार चौरस फूट रांगोळी साकारतात त्यासाठी त्याचे रांगोळीचे कौशल विकास प्रशिक्षण राबविले जाते. दि.२८ मार्च रोजी सायं ६.३० वाजता पाडवा पटांगण, गोदातीर, पंचवटी, नाशिक येथे महिला कीर्तनकार प्रेरणा बेळे यांचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रावर पूर्वार्धात कीर्तन होणार आहे. महावादनः नाशिक नगरीतील सर्व ढोल पथक एकत्र येऊन महावादन हा सामूहीक ढोल ताशा वादनाचा कार्यक्रम साकारत असतात. या वर्षी महावादन प्रमुख म्हणून नारायण जाधव कार्यरत आहेत. या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने हे उपस्थित राहणार आहे. अंतर्नाद या कार्यक्रमास प्रसिद्ध मूर्तिकार व चित्रकार प्रमोद कांबळे व अ. भा. गंधर्व महाविद्यालयाचे कुलसचिव विश्वास जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. वारसा या कार्यक्रमास युद्ध कला महर्षी विनय चोपदार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## शिवसेना प्रणित शिव कर्मचारी सेनेच्या युनियन फलकाचे अनावरण




**सातपूर (भ्रमर प्रतिनिधी) :–** शिव कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष भाऊसाहेब चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड औद्योगिक वसाहतीतील विविध कंपन्यांमध्ये शिव कर्मचारी सेना संघटनेच्या कामगार युनियनची स्थापना करण्यात आली.

या अंतर्गत पी.एम.ई.ए. सोलर टेक सोल्यूशन्स लि., डी.एम. प्रिसीजन स्टॅम्पिंग कं., एम.डी. इंडस्ट्रीज (प्लांट नं. एच–२८) आणि एम.डी. ऑटो कम्पोनंट्स प्रा. लि. (प्लांट नं. ई–७३) या चार प्रमुख कंपन्यांमध्ये युनियनचे उदघाटन पार पडले. शिव कर्मचारी सेना अध्यक्ष भाऊसाहेब चौधरी यांनी कामगार बांधवांना संबोधित करत त्यांच्या हक्कांसाठी संघटना सातत्याने लढा देईल, असे प्रतिपादन केले. तसेच, कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना सदैव त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी शिव कर्मचारी सेना महाराष्ट्र सरचिटणीस विक्रम नागरे यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या विस्ताराची आगामी कार्ययोजना सादर करण्यात आली.

नव्याने स्थापन झालेल्या युनियनच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली असून, अध्यक्षपदी आशिष सुराशे, उपाध्यक्षपदी मेहराज नागरे, खजिनदारपदी सुनील बडे आणि सेक्रेटरीपदी रवींद्र पालवे यांची नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी शिव कर्मचारी सेना सचिव कोणार्क देसाई, शिवसेना सहसंपर्कप्रमुख राजू लवटे, महानगरप्रमुख प्रवीण तिदमे, माजी नगरसेवक योगेश शेवरे, विभागप्रमुख नितीन अमृतकर, राहुल भुजबळ, कृपा मिश्रा, सार्थक नागरे, सचिंद्र मोरे, चव्हाणके, शुभम आदमाने, मेघराज नागरे, प्रवीण बडगुजर, दिनेश बडगुजर, प्रवीण सांगळे, भरत गुजर, भाऊसाहेब घुगे, गणेश काकड, चिन्मय काकड, विनोद पाटील यांसह शिवसेना, युवासेना, महिला आघाडी आणि अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कामगारांच्या हितासाठी शिव कर्मचारी सेना संघटनेच्या माध्यमातून आगामी काळात अधिक व्यापक स्तरावर कार्य केले जाईल, असे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### आजचे वाढदिवस


हाजी अकबर सुलेमान
टुरिस्ट गाईड



भारत माळवे
नाशिकरोड


राकेश खैरनार
सामाजिक कार्यकर्ता


रॉनी लव्हेरी
नाशिकरोड


योगेश कातकाडे
कर सल्लागार

### बाळांचे वाढदिवस


शरण्या पाठक


रंगोली पाठक

## सिध्दार्थ धारणे यांनी साकारले रावणाचे मनमोहक पेंटिंग

**त्र्यंबकेश्वर (भ्रमर वार्ताहर) :–** रावण जो अधर्म आणी विनाशाचे प्रतिक मानला जातो. हा तोच रावण आहे ज्याने आपल्या भक्तीने भगवान शिवशंकराला प्रसन्न करुन घेतले. तो एक केवळ राजाच नव्हता तर दहा दिशांचा स्वामी होता. विद्वान, योध्दा, तिन्ही लोकांचा स्वामी, संगित प्रेमी आणी महान शिवभक्त होता. त्यामुळे आजही रावण रचित शिवतांडव स्तोत्र असंख्य शिवभक्त पठण करतात.

एका कलाकाराची मनमोहक कलाकृती म्हणून या पेंटींगकडे बघणे अधिक उचित ठरेल. येथील युवा चित्रकार डॉ. इंजि. सिध्दार्थ धारणे यांनी अतिशय बारकाईने अभ्यास करुन रावणाची तीन फूट बाय पाच फूट आकाराची, कॅनव्हासवर अतिशय मनमोहक पेंटिंग साकारली आहे. याबाबत आर्टिस्ट सिध्दार्थ धारणे यांनी सांगितले की, आपले आराध्य दैवतांची एक प्रतिमा मनामध्ये तयार झालेली असते. मात्र रावणाची पेंटिंग काढताना बराच विचार करावा लागला. पौराणिक कथेनुसार सोन्याची लंका, सोन्याचा महाल, योध्दा असल्याने वेगवेगळी आयुधं, रावण शिवभक्त असल्याने महादेवाची पिंड, विद्वान असल्याने ग्रंथसंपदा, संगीतप्रेमी असल्याने सतार वादन करतांनाची भावमुद्रा, पुष्पक विमान, अशा सर्व बाबींचा विचार करुन हे अप्रतिम चित्र साकारण्याचा प्रयत्न केला आहे.




**ग्रामपंचायत पाटोळे ता.सिन्नर जि.नाशिक**

**जाहीर ई – निविदा सूचना क्र.२ सन २०२४/२५ (प्रथम प्रसिद्धी)**

सरपंच/ग्राम सेवक ग्रामपंचायत पाटोळे ता.सिन्नर जि.नाशिक करिता ०१ कामासाठीची ई–निविदा नाशिक जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या संकेत स्थळावरून प्रसिद्ध केलेली असून खरेदी व दाखल दि २०/०३/२०२५ ते २७/०३/२०२५ पर्यंतकरता येतील.निविदेबाबत अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून निविदाधारकांनी ई–निविदा भरणेबाबत कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे ह्याबाबत अतिंम अधिकार ग्रामपंचायत पाटोळे, ता.सिन्नर जि.नाशिक ह्यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

सही/– **सरपंच** ग्रामपंचायत पाटोळे ता.सिन्नर, जि.नाशिक | **उपसरपंच** ग्रामपंचायत पाटोळे | सही/– **ग्रामसेवक** ग्रामपंचायत पाटोळे ता.सिन्नर, जि.नाशिक







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक संपादक श्री. चंदुलाल शाह यांनी चैतन्य आर्ट्स, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक-३ येथे छापून भ्रमर कार्यालय, सीताराम चेंबर्स, पेठ फाटा, पंचवटी, नाशिक -३ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी २५१४६५०, २५११७६०
E-Mail-daily_bhramar@rediffmail.com नाशिकरोड संपर्क कार्यालय, बिटको क्लासिक, मुक्तिधाम समोर, नाशिकरोड, दूरध्वनी २४५६५४९. कार्यकारी संपादक- हितेश चंदुलाल शाह * पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
Printed, Published and Owned by Shri. Chandulal Shah and printed at Chaitanya Arts, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3 and published at Daily Bhramar, Sitaram Chambers, Peth Phata, Panchavati, Nashik-3. * Editor : Chandulal Shah * Executive Editor : Hitesh Chandulal Shah.